बातम्या, लेख
व जाहिरातीसाठी
लातूर समाचार
समर्थनगर धाराशिव
मो.९४२२४७२५०२
व ९१७२३२५७०८

| धाराशिव | वर्ष २५ वे | अंक १५५ वा | बुधवार दिनांक २७ ऑगस्ट, २०२५ | पृष्ठे ६ | किंमत १.५० ₹
RNI MAHMAR/2003/11649

# लातूर समाचार

प्रकाशन: धाराशिव (उस्मानाबाद आवृत्ती)
(सांज दैनिक) पोष्ट परवाना
L2/RNP/OMD- 52/24-26
dainiklatursamachar@gmail.com
संस्थापक : स्व. शंकर माधव जडे (स्वातंत्र्य सैनिक)

प्रियंका
ढाबा हॉटेल
गड पाटी जवळ
धाराशिव.
रूचकर भोजनासाठी
भेट द्या

## पारदर्शकता आणि सेवा-आधारित उपक्रमांच्या अंमलबजावणीमुळे प्रशासनाची आदर्श प्रशासनाकडे वाटचाल : शेतकरी,सामाजिक लाभार्थी आणि नागरिकांसाठी उपलब्ध होताहेत नवीन संधी



धाराशिव (जिमाका) -धाराशिव जिल्हा प्रशासनाने शेतकरी, सामाजिक लाभार्थी व नागरिकांसाठी डिजिटलायझेशन,पारदर्शकता आणि सेवा-आधारित उपक्रमांची अंमलबजावणी केली आहे.कृषी विकास,आपत्ती व्यवस्थापन, सामाजिक सुरक्षा व ई-ऑफिस यामुळे जिल्हा प्रशासनाच्या कामकाजाचा वेग आणि गुणवत्ता दोन्ही वाढले असून,जिल्हा राज्यातील आदर्श प्रशासनाकडे वाटचाल करत आहे.

जिल्हा प्रशासनाने कृषी,महसूल, सामाजिक योजना,आपत्ती व्यवस्थापन आणि तंत्रज्ञानाधारित उपक्रमांद्वारे उल्लेखनीय प्रगती साधली आहे.गेल्या काही महिन्यांत राबविण्यात आलेल्या विविध योजनांचा आढावा घेतल्यास प्रशासनाचे कामकाज अधिक पारदर्शक,गतिमान आणि शेतकरी-केंद्रित होत असल्याचे स्पष्ट होते.

**ई-पीक पाहणी आणि कृषी विकास**

केंद्र शासनाच्या निर्देशानुसार खरीप २०२५ साठी ई-पीक पाहणी ऊडड मोबाईल ॲप (व्हर्जन ४.०.०) शेतकऱ्यांसाठी उपलब्ध करून देण्यात आले आहे. शेतकऱ्यांनी १ ऑगस्ट ते १४ सप्टेंबर २०२५ या कालावधीत स्वतः नोंदणी करून ई-पीक पाहणी करावी,तर १५ सप्टेंबर ते २९ ऑक्टोबर दरम्यान सहाय्यक स्तरावर ती प्रक्रिया पूर्ण केली जाणार आहे. वेळेत पाहणी केल्यास शेतकऱ्यांना कृषी पतपुरवठा,पीक विमा,दावे आणि नैसर्गिक आपत्तीतील नुकसानभरपाई त्वरित मिळणार आहे.

शेतरस्त्यांच्या सुधारासाठीही जिल्हा प्रशासनाने प्रयत्न सुरू ठेवले असून आतापर्यंत ३४१ शेतरस्त्यांवरील अतिक्रमण हटवून २९० किलोमीटर रस्ते मोकळे करण्यात आले आहेत. याचा थेट लाभ ६ हजार ५०० पेक्षा अधिक शेतकऱ्यांना होणार आहे.

**नोंदणी आणि डिजिटल उपक्रम**

राष्ट्रीय भूमी अधिनुकीकरण कार्यक्रमांतर्गत ई-फेरफार प्रणालीद्वारे हरकत नसलेल्या २१ हजार १५० नोंदी केवळ २० दिवसांत,तर हरकत असलेल्या ३७९ नोंदी ६६ दिवसांत निर्गमित झाल्या आहेत.तसेच ॲग्रीस्टॅक (-सीळडींरलज्ञ) प्रकल्पांतर्गत शेतकरी ओळख क्रमांक तयार करण्यात येत असून धाराशिव जिल्ह्यातील ४ लक्ष ७७ हजार ४४ शेतकऱ्यांपैकी ३ लक्ष ५० हजार २६८ शेतकऱ्यांनी नोंदणी २६ ऑगस्टपर्यंत केली आहे.एकूण खातेदारांच्या तुलनेत ॲग्रीस्टॅक नोंदणी केलेल्या शेतकरी खातेदारांची टक्केवारी ७३.४४ टक्के इतकी आहे.

**सामाजिक सुरक्षा व अनुदान वितरण**

संजय गांधी निराधार योजना व श्रावणबाळ राज्य निवृत्तीवेतन योजनेंतर्गत एकूण ९५ टक्के लाभार्थ्यांचे महाडीबीटी पोर्टलवर नोंदणी पूर्ण झाली आहे.त्यांना ऑगस्ट २०२५ पर्यंतचे अनुदान वितरीत करण्यात आले आहे.

नैसर्गिक आपत्तीमुळे बाधित शेतकऱ्यांसाठी शासनाने मोठ्या प्रमाणावर निधी मंजूर केला आहे. सप्टेंबर २०२४ मधील अतिवृष्टीत बाधित १ लक्ष ५१ हजार ३०८ शेतकऱ्यांना १८७८४.६५ लक्ष रुपये वितरीत करण्यात आले आहे. एप्रिल-मे २०२५ आलेल्या अवेळी पावसामुळे बाधित ११ हजार २८० शेतकऱ्यांसाठी ९०१.८३ लक्ष रुपये मंजूर करण्यात आले आहे. ऑक्टोबर २०२४ मध्ये आलेल्या अतिवृष्टीत बाधित ७९ हजार ८८० शेतकऱ्यांसाठी ८६४६.३३ लक्ष रुपये मंजूर झाले आहे.

**ई-ऑफिस प्रणालीत धाराशिव अग्रगण्य**

जिल्ह्यातील सर्व महसूल कार्यालये आता ई-ऑफिस प्रणालीवर १०० टक्के कार्यरत असून,धाराशिव जिल्हा राज्यात चौथ्या क्रमांकावर आहे. यामुळे प्रशासनिक कामकाज जलद, पारदर्शक व लोकाभिमुख झाले आहे.

**दहन व दफनभूमी सुविधा**

जिल्ह्यातील ३३० गावांमध्ये दहनशेड नसल्याचे लक्षात घेऊन जिल्हा नियोजन समितीमार्फत २६ कोटी ४० लक्ष रुपये निधी उपलब्ध करून देण्यात आला. त्यातून २६८ दहनशेड पूर्ण झाले आहेत. तसेच, जागा नसलेल्या ३६१ गावांपैकी २१० गावांना शासकीय जागा मिळाली असून,उर्वरित गावांमध्ये शेतकऱ्यांच्या संमतीने खाजगी जागा थेट खरेदी पद्धतीने उपलब्ध करून देण्यात आली आहे.

**शिबीर अभियान आणि नागरिक सेवा-**

प्रत्येक महसूली मंडळात छत्रपती शिवाजी महाराज महाराजस्व समाधान शिबीर अभियान राबविण्यात येत आहे.यात नागरिकांना राहिवासी,जाती,उत्पन्न दाखले,रेशनकार्ड,सामाजिक योजनांचे लाभ यांचे त्वरित वाटप करण्यात येत आहे.हे शिबिरे आता दर तीन महिन्यांनी आयोजित करण्यात येणार आहे.त्यामुळे जास्तीत जास्त नागरिकांना विविध योजनांचा लाभ मिळण्यास मदत होणार आहे.

डिजिटल ॲप्समुळे प्रशासन अधिक गतिमान होण्यास मदत झाली आहे. जिल्हा प्रशासनाने १५० दिवसांच्या कृती आराखड्यातून विविध ॲप्स विकसित केली आहेत.यामध्ये कल्पवृक्ष App - शासकीय निर्णय (GR) त्वरित उपलब्ध. तुळजाई धाराशिव हेल्पलाईन App -नागरिकांना २४७ मार्गदर्शन. कार्यसिद्धी App - प्रकल्प ट्रॅकिंग व समन्वय. जीवनरेखा (जीवंत रस्ते) -pp - शेतरस्त्यांवरील अतिक्रमण निवारण. धाराशिव डिस्ट्रिक्ट डॅशबोर्ड -pp -जल जीवन मिशन,प्रधानमंत्री आवास योजना, स्वच्छ भारत,मनरेगा आदी योजनांचे रिअल-टाईम डेटा व तुलनात्मक विश्लेषण करण्यात आले आहे. शेतकरी,सामाजिक लाभार्थी आणि नागरिकांसाठी डिजिटलायझेशन, पारदर्शकता आणि सेवा आधारित उपक्रमांची प्रभावीपणे अंमलबजावणी करण्यात येत आहे. जिल्हा प्रशासनाची या कामातून आदर्श प्रशासनाकडे वाटचाल सुरू आहे.त्यामुळे विविध योजनांचे लाभार्थी व नागरिकांमध्ये समाधान व्यक्त होत आहे.

## क्राईम न्युज

### जिल्ह्यात मद्य विरोधी कारवाई करण्यात आली

धाराशिव (प्रतिनिधी)-तिल्ह्यातअवैध मद्य विरोधी कारवाई कारवाई करण्यात आली असून विविध ठिकाणाच्या पोस्टे मधुन समजलेली माहिती अशी की, लोहारा पोलीस ठाणे अंतर्गत भाउराव अरुण रा. तिर्थ बु. ता. तुळजापूर जि. धाराशिव हे दि.२४.०८.२०२५ रोजी लोहारा येथे अंदाजे ४,७२,००० किंमतीच्या देशी विदेशी दारुच्या २८८ सिलबंद बाटल्या सह स्विफ्ट डिझायर कारक्र एमएच ४२ए. एच ६४९९ अवैध विक्रीच्या उद्देशाने जवळ बाळगलेल्या जप्त करण्यात आल्या. यावरुन पोलीसांनी अवैध मद्य जप्त करुन नमूद व्यक्तीविरुध्द महाराष्ट्र मद्य मनाई कायदा कलम- ६५(ई) अन्वये लोहारा पो ठाणे येथे गुन्हा नोंदविला आहे.

येरमाळा पोलीस ठाणे अंतर्गत उध्दव रा. चोराखळी ता. कळंब जि. धाराशिव हे दि.२५.०८.२०२५ रोजी आपल्या राहत्या घरासमोर चोराखळी येथे अंदाजे २,२०० किंमतीची २२ लिटर गावठी दारु अवैध विक्रीच्या उद्देशाने जवळ बाळगलेली जप्त करण्यात आली. यावरुन पोलीसांनी अवैध मद्य जप्त करुन नमूद व्यक्तीविरुध्द महाराष्ट्र मद्य मनाई कायदा कलम- ६५(ई) अन्वये येरमाळा पो ठाणे येथे गुन्हा नोंदविला आहे.

बेंबळी पोलीस ठाणे अंतर्गत किशोर रा. पाण्याचे टाकीजवळ, कोलवाडी ता. हवेली जि. पुणे ह.मु. गौडगाव ता. जि. धाराशिव हे दि.२५.०८.२०२५ रोजी १३.०० वा. सु. सुजित गोवर्धन गुळवे यांचे शेतातील पत्र्याचे शेडचे बाजूला अंदाजे १२,६६० किंमतीच्या देशी विदेशी दारुच्या ५२ सिलबंद बाटल्या १०० लिटर सिंधीताडी अम्ली द्रव अवैध विक्रीच्या उद्देशाने जवळ बाळगलेले जप्त करण्यात आले. यावरुन पोलीसांनी अवैध मद्य जप्त करुन नमूद व्यक्तीविरुध्द महाराष्ट्र मद्य मनाई कायदा कलम- ६५(ई) अन्वये बेंबळी पो ठाणे येथे गुन्हा नोंदविला आहे.

अंबी पोलीस ठाणे अंतर्गत हणुमंत रा. कंडारी ता. परंडा जि. धाराशिव हे दि.२५.०८.२०२५ रोजी कंडारी चौकात एका छपराच्या आडोशाला अंदाजे ९८० किंमतीच्या देशी विदेशी दारुच्या १४ सिलबंद बाटल्या अवैध विक्रीच्या उद्देशाने जवळ बाळगलेले जप्त करण्यात आले. यावरुन पोलीसांनी अवैध मद्य जप्त करुन नमूद व्यक्तीविरुध्द महाराष्ट्र मद्य मनाई कायदा कलम- ६५(ई) अन्वये अंबी पो ठाणे येथे गुन्हा नोंदविला आहे.

भुम पोलीस ठाणे: अंतर्गत सुभाष रा. बह्राणपुर रोड उळुप फाटा ता. भुम जि. धाराशिव हे दि.२५.०८.२०२५ रोजी बह्राणपुर गावाकडे जाणाऱ्या रोडलगत अंदाजे ३३,६०० किंमतीची ३० लिटर गावठी दारु व ६०० लिटर गावठी दारु निर्मीतीचे गुळमिश्रीत रासायनिक द्रव अवैध विक्रीच्या उद्देशाने जवळ बाळगलेले जप्त करण्यात आले.

## विपुल पिसे चे तालुकास्तरीय बुद्धिबळ स्पर्धेत घवघवीत यश



धाराशिव (प्रतिनिधी)-तालुकास्तरीय बुद्धिबळ स्पर्धेत जिल्हा परिषद प्रशालेचा विद्यार्थी विपुल विजय पिसे इयत्ता नववी याने घवघवीत यश संपादन करून जिल्हास्तरीय स्पर्धेसाठी पात्र ठरला आहे. दिनांक २५-८-२५ रोजी झालेल्या शालेय तालुकास्तरीय बुद्धिबळ स्पर्धेचे आयोजन श्री श्री रविशंकर विद्या मंदिर अणदूर येथे करण्यात आले होते. यामध्ये तुळजापूर तालुक्यातील विविध शाळेतील १७८ इच्छुक खेळाडूंनी सहभाग नोंदवला होता. यामध्ये १७ वर्षीय वयोगटातील मुले व मुली यांनी आपला सहभाग नोंदवला या स्पर्धेमध्ये १७ वर्षे वयोगटातील मुलांमध्ये जिल्हा परिषद प्रशाला जळकोटचा विद्यार्थी विपुल विजय पिसे याने घवघवीत यश संपादन केल्याने होणाऱ्या जिल्हास्तरीय शालेय बुद्धिबळ स्पर्धेत त्याची निवड झाली आहे.

या यशाबद्दल शालेय व्यवस्थापन समिती, शाळेचे मुख्याध्यापक संतोष सारणे सर, समाधान पवार सर, जयराम शिंदे सर, पुष्पलता कांबळे मॅडम, बनपट्टे सर, सुरवसे मॅडम, कदम मॅडम, यांचे सहकार्य लाभले. या यशाबद्दल सर्वांनी त्याचे अभिनंदन करून पुढील जिल्हास्तरीय बुद्धिबळ स्पर्धेसाठी शुभेच्छा दिल्या. या यशाबद्दल पालक वर्गातून कौतुक केले जात आहे.

## समाजशास्त्र पदव्युत्तर विषयात विद्यापीठात प्रथम आलेला नागराज पालापूरे यांचा बापूराव पाटील यांच्या हस्ते सत्कार



मुरूम (सुधीर पंचगल्ले)येथील श्री माधवराव पाटील महाविद्यालयातील समाजशास्त्र पदव्युत्तर विषयात मार्च-एप्रिल २०२५ मध्ये झालेल्या परीक्षेत गुणाानुक्रमे डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठातून प्रथम क्रमांक मिळविल्याबद्दल नगर शिक्षण विकास मंडळाच्या वतीने जिल्हा बँकेचे अध्यक्ष बापूराव पाटील यांच्या हस्ते नागराज पालापूरे यांचा मंगळवार (ता. २६) रोजी सांस्कृतिक सभागृहात सत्कार करण्यात आला. या महाविद्यालयाने गुणवत्तेची परंपरा गेल्या अनेक वर्षापासून जोपासलेली असून पुढेही ही गुणवत्ता कायम राखण्याचा मनोधर्य यावेळी बापूराव पाटील यांनी व्यक्त केला. यावेळी माजी नगराध्यक्ष धनराज मंगरुळे, संस्थेचे संचालक राजेंद्र भोसगे, डॉ. सतिश शेळके, सुजित शेळके, चंद्रकांत बालकुंदे, गणेश अंबर, प्राचार्य डॉ. अशोक सपाटे, बेळंब चे सरपंच महालिंगप्पा बाबशेट्टी, पालक सुभाष पालापूरे, रोहित पालापूरे आदींची प्रमुख उपस्थिती होती. यावेळी सतिश शेळके यांनी मनोगत व्यक्त केले. या कार्यक्रमाचे प्रास्ताविक प्राचार्य अशोक सपाटे यांनी केले. सूत्रसंचालन प्रा. डॉ. सुभाष हुलपल्ले तर आभार प्रा. डॉ. महेश मोटे यांनी मानले. यावेळी विविध शाखेचे विद्यार्थी-विद्यार्थिनी, प्राध्यापक-प्राध्यापिका व शिक्षकेत्तर कर्मचारी बहुसंख्येने उपस्थित होते.

## सोन्याचे दागिने,मोबाईल फोन व रोख रक्कमेची चोरी

तामलवाडी (प्रतिनिधी)- पोलीस ठाणे तामलवाडी पोलीस ठाणे अंतर्गत फिर्यादी दिलीप मारुती सराटे, वय ५०वर्षे, रा. देवकुराळी ता तुळजापूर जि. धाराशिव हे राहते घरी झोपले असता त्याचे घराचे रुमचे कुलूप अज्ञात व्यक्तीने दि.२४.०८.२०२५ रोजी तोडून आत प्रवेश करुन घरातील २० ग्रॅम सोन्याचे दागिने,मोबाईल फोन व रोख रक्कम ४०,००० असा एकुण १,०१,०००किंमतीचा माल चोरुन नेला. अशा मजकुराच्या फिर्यादी नामे-दिलीप सराटे यांनी दि.२५.०८.२०२५रोजी दिलेल्या प्रथम खबरेवरुन तामलवाडी पो ठाणे येथे गुन्हा नोंदवला आहे.

## जिल्हा शासकीय महिला रुग्णालयात जिल्हाधिकारी व सिईओ यांची भेट



धाराशिव (प्रतिनिधी)-जिल्हा शासकीय महिला रुग्णालयात जिल्हाधिकारी किर्ती किरण पुजार व जिल्हा परिषदेचे सिईओ मैनाक घोष यांनी भेट दिली, अधिष्ठाता डॉ शैलेंद्र चौहाण, वैद्यकीय अधिक्षका डॉ स्मिता गवळी, वैद्यकीय अधिक्षक डॉ तानाजी लाकाळ यांनी त्यांचे पुष्पगुच्छ देऊन स्वागत केले तर जिएमसी सुरक्षा समिती व रुग्ण कल्याण समितीच्या वतीने अब्दुल लतीफ गणेश वाघमारे यांनी देखील स्वागत केले.

जिल्हाधिकारी यांनी भेटी दरम्यान रुग्णालयाची पाहणी केली व रुग्णालयातील अडचणी समजून घेतल्या, रुग्णालयाची जागा अपुरी पडत असल्याने रुग्णालया शेजारील मोकळी असलेली शासनाची जागा ही रुग्णालयाला हस्तांतरित करण्यात येऊन त्या जागेवर रुग्णांच्या नातेवाईकांना निवारा केंद्र,गाडी पार्किंग सह इतर सुविधा उपलब्ध होतील, यावरती महत्त्वपुर्ण चर्चा झाली, यावेळी अधिष्ठाता डॉ. शैलेंद्र चौहाण वैद्यकीय अधिक्षक डॉ, स्मिता गवळी वैद्यकीय अधिक्षक डॉ तानाजी लाकाळ,जिएमसी सुरक्षा समिती सदस्य अब्दुल लतीफ,गणेश वाघमारे,आरोग्य मित्र शेख रौफ,डॉ.सचिन रामढवे, डॉ.साबळे,एपिआय नाईकवाडी,श्री जावळे,मेट्रान रिबेका भंडारी,संतोष कुंभार,श्री मुंढे पाटील,दत्ता रसाळ,सह इतर उपस्थित होते.

## सिद्धी मिटकर चे बुद्धिबळ स्पर्धेत यश

तुळजापूर (प्रतिनिधी)-तालुका चौदा वर्षाखालील मुलींच्या शालेय बुद्धिबळ स्पर्धेत सिद्धी मिटकर ने तालुक्यातुन द्वितीय क्रमांक मिळवून यश संपादित केले.

महाराष्ट्र शासनाच्या शालेय विभागामार्फत राज्यातील मुलांच्या क्रीडा गुणांना व्यासपीठ मिळवून देण्यासाठी जिल्हा व तालुकास्तरावर अनेक स्पर्धांचे आयोजन केले जाते.याचाच एक भाग म्हणून तुळजापूर तालुक्यातील १४ वर्षाखालील मुलींच्या बुद्धिबळ स्पर्धांचे आयोजन अणदूर येथील



श्री.श्री.रविशंकर विद्यालयात झाले.

तालुक्यातील जवळपास २१९ शाळा व ९००० मुलींमधून सुरुवातीला शालेय स्पर्धा घेतल्या गेल्या. त्यामध्ये तालुका स्तरावर पात्र झालेल्या मुली निवडल्या गेल्या.अत्यंत अटीतटीच्या झालेल्या या लढतीतून सिद्धी मिटकर ने तालुकास्तरावर द्वितीय क्रमांक मिळवला व जिल्हास्तरासाठी पात्र झाली.

लोटस पोदार इंग्लिश स्कूल तुळजापूर येथील शाळेचे मुख्याध्यापक श्री.धनंजय शहापूरे तसेच बुद्धिबळ मार्गदर्शक श्री.अशोक बनकर,श्री.माऊली भुतेकर यांचे मार्गदर्शन सिद्धीला लाभले. या यशाबद्दल सिद्धीचे सर्व स्तरातून अभिनंदन होत आहे.

ओ३म् भूर्भुवः स्वः ।
तत्सवितुर्वरेण्यं भर्गो देवस्य धीमहि ।
धियो यो नः प्रचोदयात् ।।

# लातूर समाचार

## गणेश उत्सवामागील उद्देश लोप पावत आहे

गणेशस्थापने मागील लोकमान्य टिळकांचा असलेला उद्देश आज पूर्णत्वास गेलेला दिसतो का? या प्रश्नाचे उत्तर हो किंवा नाही याच फूटपट्टीत अपेक्षित असावे. हो तर म्हणू शकतच नाही. उत्तर नाही हेच असले तरी नाही असे म्हणतानाही मनात अनेक विचार आणि प्रश्न वाहत राहतात. त्याबाबत आधी लोकमान्य टिळकांनी सुरू केलेल्या या गणेशोत्सवाची उद्दिष्टे, हेतू काय होते, यावर विचार, चिंतन व मनन केले पाहिजे. देश पारतंत्र्यात होता. ब्रिटिशांच्या गुलामगिरीमुळे त्रस्त झाला होता. समाज विस्कटलेला होता. अनेक जाती वंश, वर्ण, अंधश्रद्धा आज्ञान यामुळे समाज एकसंध नव्हता. ब्रिटिशांचेच लांगुलचालन करणारा एक भारतीय वर्गही होता. मात्र सामान्य जनांना, परकीय सत्तेचा जुलूम आणि अत्याचार याविरुद्ध एकत्र आणणे हे जरुरीचे आहे असा विचार जाज्वल्य देशाभिमानी आणि राष्ट्रवादी, स्वातंत्र्यप्रेमी लोकमान्य टिळकांच्या मनात सतत असे. ब्रिटिशांच्या मते तर भारतीय असंतोषाचे ते जनकच होते. ब्रिटिशांशी सामना हा केवळ अर्ज विनंत्या करून होणार नाही हे जसे टिळकांनी जाणले होते तसेच लोक भावनेची ही नस त्यांनी ओळखली होती. जाती, उपजातीच्या जंजाळात अडकलेल्या जनतेला धार्मिक आवाहन केल्यास हेवे-दावे विसरून, ही जनता एकत्र येऊ शकेल हे लोकमान्य टिळकांनी जाणले आणि त्यातूनच सार्वजनिक गणेशोत्सवाची कल्पना त्यांना सुचली. म्हणजेच या गणेशोत्सवाची मूळ कल्पना स्वराज्यासाठी संघटन ही होती. आणि म्हणूनच घराघरातला गणेशोत्सव त्यांनी हमरस्त्यावर आणला. हा खाजगी उत्सव सार्वजनिक केला. लोकमान्य टिळकांनी १८९३ साली केसरीवाड्यात त्याची सुरुवातही केली. समाज प्रबोधन हा या सार्वजनिक गणेशोत्सवाच्या मागचा मूळ हेतू होता. या माध्यमातून त्यांनी क्षात्रतेज आणि देशप्रेम यांची अलौकिक सांगड घातली. ‘स्वराज्य हा माझा जन्मसिद्ध हक्क आहे आणि तो मी मिळवणारच’ हे त्यांनी अशा पद्धतीने लोकांच्या मनावर बिंबवले. थोडक्यात लोकमान्य टिळकांच्या या सार्वजनिक गणेशोत्सव साजरा करण्यामागे राष्ट्रकारण होते. एक अत्यंत उदात्त, प्रेरक असे कारण होते. धर्मकार्य हा केवळ बहाणा होता. स्वराज्य निर्मितीची आस उत्पन्न व्हावी हेच ध्येय होते. या सार्वजनिक गणेशोत्सवाची किर्ती चहुदूर पसरली आणि गावोगावी अनेक सार्वजनिक गणेशोत्सव मंडळे स्थापन होऊ लागली. आणि ती परंपरा आज सव्वाशे वर्षानंतरही टिकून आहे. मात्र आजच्या गणेशोत्सवात लोकमान्य टिळकांच्या गणेशोत्सवातील उद्दिष्टे दिसतात का या प्रश्नाचे नाही असे ठाम उत्तर देताना सर्वांच्या मनात काही विचार येतात. पारतंत्र्याच्या काळाचा फक्त इतिहास मी मनापासून अभ्यासला आणि त्याचा मला आजही अभिमान आहे. गणेश मूर्तीभोवती केलेले ते सुंदर महाभारत, रामायणातल्या कथा सांगणारे देखावे आठवले. गणेशोत्सवात सादर केलेली नाटके आठवली. कित्येक नामवंत कलाकार या गणेशोत्सवांनी रंगभूमीला दिले. उत्तम वक्त्यांची प्रबोधन पर भाषणे ऐकली.कीर्तने ऐकली. संगीत मैफिलीतले नामवंत गायक आठवते. ते परिसंवाद, बौद्धिके सार काही आठवते आणि त्या पार्श्वभूमीवर आजचे गणेशोत्सव अनुभवताना नक्कीच उदासीनता येते. लोकमान्य टिळक तर यातून हरवलेलेच आहेत. आता उद्दिष्ट हरवले आहे आणि उत्सव राहिला आहे. त्यातही पैसा, दिखावा, राजकारण यांचा प्रवेश झाला आहे. सण उत्सव हे संघटनात्मक असतात. समाजात ऐक्य, बंधुभाव प्रेम, समता, निर्माण करण्यासाठी असतात ही भावना न दिसता स्पर्धात्मक वादच दिसतात. अहमहमिका, चढाओढ दिसते. राष्ट्र कारण न दिसता राजकारण जाणवते. गोंगाट आणि धिंगाणा अनुभवायला मिळतो. शहरात तर कित्येक वेळा सार्वजनिक गणेशोत्सवामुळे गल्लोगल्ली वाहनांची कोंडी होऊन जनजीवनच विस्कळीत होते. म्हणूनच आजच्या गणेशोत्सवात लोकमान्य टिळकांच्या सार्वजनिक गणेशोत्सवाच्या कल्पना टिकून आहेत का? या प्रश्नाचे नाही असे उत्तर देतानाही एकच वाटते की आता काळ बदललाय. देश स्वतंत्र ही झाला. देशाला स्वातंत्र्य मिळून पंचाहत्तर वर्षे होऊन गेली. स्वातंत्र्यासाठी जनजागृती किंवा संघटन हे या गणेशोत्सवा मागचे टिळकांचे उद्दिष्ट आज ऊरले नसले तरी उद्दिष्टे बदलू शकतात. ती अधिक सकारात्मक असू शकतात. आज देश स्वतंत्र असला तरीही मानसिक गुलामगिरीत आहेच. आजच्या सार्वजनिक गणेशोत्सवात आपण आपला देश, आपल्या राष्ट्रीय समस्या, आपले विज्ञान प्रगत जीवन, त्याचबरोबर आपली घसरत चाललेली नीती मूल्ये, देशाभिमान यासंदर्भात पुन्हा एकदा देशाला संघटित करण्याची, ऐक्याच्या प्रवाहात आणण्याची प्रेरणा बाळगली पाहिजे.नव्या पिढीला आपल्या प्रेरक इतिहासाची ओळख करून द्यायला हवी. म्हणूनच नुसतेच ढोल ताशे नकोत. थिल्लरपणा नको. एकापेक्षा एक गणेश मूर्तींचे प्रदर्शन नको. नुसताच उत्सव नको. सोहळा नको. तर जी परंपरा अनेक वर्ष आपण टिकवली आहे त्यात नवी आवाहने पेलण्याचे सामर्थ्य दिसले पाहिजे. आणि हे इतर अनेक सार्वजनिक उत्सवासाठीही लागू आहे. तर आणि तरच लोकमान्य टिळकांच्या या सार्वजनिक उत्सवाला दिलेला मान ठरेल आणि आजच्या ‘नाही चे उद्याच्या ‘हो’ मध्ये परिवर्तन होऊ शकेल. जो राष्ट्रीय प्रेरणाना निर्माण करण्याचा उद्देश होता तो सर्वांनी पुन्हा निर्माण करण्याचा प्रयत्न केला पाहिजे. राज्यात अनेक जटील प्रश्न आहे. राष्ट्रीय एकात्मता नावालाच आहे. प्रत्यक्षात भेदभाव दिसून येतो. देशपातळीवर तर अनेक समस्या आहे. वेळीच सावध झालो नाही तर पुन्हा स्वराज्यासाठी लढावे लागणार आहे. ज्या स्वराज्यासाठी टिळकांनी प्राणपनाला लावले त्याचे भान विशेष करून युवकांनी लक्षात घेतले पाहिजे. युवक सध्याला मोबाईलमध्ये गुंतला गेला आहे. अभ्यास, टयुशन क्लासेस मध्येच गुंतला यातून बाहेर पडून निश्चित परिवर्तनवादी बनले पाहिजे. पुन्हा टिळकांचे विचार रुजविण्याची गरज आहे.

# गोढाळा येथील स्वयंभू शिवलिंग महादेवाचे हजारो भाविक-भक्तांनी घेतले दर्शन





**रेणापूर/प्रतिनिधी :** रेणापुर तालुक्यातील गोढाळा. तालुका रेनापुर येथे महादेवाचे स्वयंभू शिवलिंग आसून अत्यंत जागृत देवस्थान आहे... या स्वयंभू शिवलिंगाच्या ठिकाणी ब्रह्म. विष्णू. महेश.. तिन्हीदेवाचा अंश आहे अशी पूर्वपारख्यायिका आहे. या गावात अनेक देव देवतांचे मंदिरे असून थोर संत महात्म्यांच्या समाधी स्थळांनी भरलेले .. आहे म्हणूनच या गावाला मराठवाड्यात संतांची भूमी म्हणून ओळखले जाते.. . संतांची समाधी स्थळे...आणि स्वयंभू लिंग. यांचे एक विशेष महत्त्व एका ग्रंथात. सांगितले आहे. संतांनी समाधी घेतल्यानंतर त्यांचे कार्य सूक्ष्मातून अधिक प्रमाणात होते ...संतांनी देह त्याग केल्यावर.. त्यांच्या देहातून प्रक्षेपित होणाऱ्या ..चैतन्य लहरी.. आणि सात्विक लहरी ..यांचे प्रमाण अधिक असते ..... तसेच स्वयंभू शिवलिंगाच्या ठिकाणी इतर शिवलिंगाच्या तुलनेत निर्गुण तत्त्वाचे प्रमाण अधिक असल्यामुळे ..त्यातून अधिक प्रमाणात निर्गुण चैतन्य आणि सात्विकता. यांचे सतत प्रक्षेपण चालू असते ..त्यामुळे पृथ्वीवरील वातावरणाची सतत शुद्धी होत असते... त्यांच्यासह स्वयंभू शिवलिंग आणि संतांचे समाधी स्थळ यातून पातळाच्या दिशेने सतत. निर्गुण चैतन्य आणि सात्विकता यांचे प्रक्षेपण होऊन.. पाताळातील वाईट शक्तीशी.. त्यांचे सतत युद्ध चालू असते ..त्यामुळे भू लोकांचे पाताळातील शक्तिशाली वाईट शक्तीच्या आक्रमणापासून सततपणे संरक्षण होत असते.. स्वयंभू शिवलिंगामध्ये शिवाचे निर्गुण तत्व अधिक सामावलेले असते.. शिव तत्वाच्या इच्छाशक्तीचे सगुन रूप म्हणजेच.. स्वयंभू शिव पिंड. .तथा.. शिवलिंग... त्यामुळे शिवाची प्रकट शक्ती .या शिवलिंगामध्ये अधिक प्रमाणात सामावलेली.असते.. स्वयंभू शिवलिंगामध्ये तथा शिवपिंडीमध्ये मानवनिर्मित शिवलिंगाच्या तुलनेत अधिक सात्विकता असते.. मानवनिर्मित शिवलिंगाच्या प्राणप्रतिष्ठेनंतर .त्यात मंत्राच्या साह्याने देवतेची तत्त्वे आणण्यात येतात ....ही तत्त्वे मुळातच स्वयंभूशिवलिंगामध्ये अस्तित्वात असतात... म्हणून गोढाळा येथील स्वयंभू शिवलिंग अत्यंत महत्त्वाचे शिवलिंग आहे.. या शिवलिंगाला फोडून टाकण्यासाठी निजाम कालीन राज्यात.. कोणी एक माथेफिरू येऊन हे शिवलिंग फोडण्याचा प्रयत्न केला असता .या शिवलिंगावर लोखंडे घनाचा घावघातल्याबरोबर या शिवलिंगातून रक्त वाहिनी सुरू झाली .ते रक्त त्यामाथेफिरूच्या दृष्टीस पडल्याबरोबर त्याची दृष्टी गेली तो माथे फिरू चाचपडत .मंदिराच्या बाहेर आला.. बाहेर आल्याबरोबर..त्याला पुन्हा दृष्टी आली आणि पाहिले तर मंदिर पूर्ण रक्ताने भरलेले आहे.... त्याने रक्त पाहिल्याबरोबर अरे ये..तो अल्ला जिंदा है.. असे बोलून तो माते फिरू तिथून निघून गेला ..तो घन मारलेला घाव आजही आपणास पाहायला मिळत आहे.... या पुण्य पवित्र भूमी तील.. पहिले . श्री संत नागोजी बुवा महाराज यांनी आडातून तूप काढून पंगतिला. वाढले येथेच कुत्र्याची. व बैलाचे समाधी आहे. येथील कुत्रा आणि बैल हे प्राणी सुद्धा एकादशी वृत्त करीत असत.. महाराजांच्या समाधीवर गेलेला कडुलिंबाचा झाडाचा पाला सुद्धा गोड लागत आहे आजही तो पाला गोड लागतो.... दुसरे श्री संत गोविंद बुवा महाराज.. यांचे पंढरपुरात पांडुरंगाने कुत्र्याचे रूप घेऊन घर सांभाळले आहे.. महाराज एकदा पंढरपूर वारीला जात असताना अर्ध्या वाटेत गेल्यावर त्यांचा स्वतःचा मुलगा मृत्यू पावला त्यावेळी काही ग्रामस्थांनी महाराजांना वाटेत जाऊन निरोप दिला महाराज आपला मुलगा मृत्यू पावला आहे तेव्हा महाराजांनी सांगितले ज्याचा होतात त्याने नेला मी येऊन तरी काय करणार आहे मी वारी सोडून परत येणार नाही असे म्हणून महाराज सरळ पंढरपूर वारीला गेले.... तिसरे संत श्री संत मनोहर बुवा यांची आख्यायिका पंचक्रोशीतील तसेच मराठवाड्यातील सर्वांना माहिती आहे... महाराजांनी स्वतःच मरण अगोदरच सांगितले होते आणि त्या दिवशी गावातील पोलीस पाटील चेअरमन प्रतिष्ठित ग्रामस्थांना बोलावून सांगितले मला आज जायचे आहे आणि माझे. दहन. गोवरी मध्ये न करता चंदनाच्या लाकडामध्येच मला दहन करावं असे स्वतः महाराजांनी सांगितले .होते... महाराज समाधीस्थ झाल्यावर त्यांच्या समाधी मधून सतत पणे तीन महिने विठ्ठल नामाचा गजर आणि विण्याचा ध्वनी आवाज येत होता.... गोढाळा . पवित्र पुण्यवान भूमी हि . वारकरी संप्रदायाचे अधरयू श्री संत वास्कर महाराज. श्री संत मोतीराम महाराज श्री संत माधव.मामा.. महाराज.. श्री संत माधव शास्त्री महाराज.. श्री संत निवृत्तीनाथ तेली महाराज.. ज्यांना आपण भुत्या तेली असे म्हणतो.. भुत्या तेली हे महाराज गोढाळा या गावचा. शोध घेत घेत गोडाळा नगरीत आले आणि येथील स्वयंभू शिवलिंग असे महादेव मंदिरात चार दिवस त्यांनी मुक्काम केला .. ज्यांची.कावड शिखर शिंगणापूर येथे नंबर एकची प्रसिद्ध कावड आहे... अशा एक ना अनेक संत महात्म्यांच्या पदस्पर्शाने पावन झालेली हि.पवित्र भूमी आहे म्हणून या गावास...... गोढाळा हे गाव... पुण्यभूमी ठाव ...दैवताचे नाव महादेव. ..ऐसे स्थळ नाही कोठे.. फिरता महाराष्ट्र .. दृष्टी न भेटे...संत जनाची मांदियाळी ..स्वयंभू लिंग जये स्थळी .. भक्तीचे हे माहेरघर... नाम स्मरण निरंतर.... असे म्हणतात........गोढाळा. येथील महादेवाची कावड मराठवाड्यात प्रसिद्ध कावड आहे.... अशा या थोर संत महात्म्यांची. श्री संत वास्कर महाराज सांप्रदायिक.... वारकरी सांप्रदायाची परंपरा आमच्या येथील अध्यात्मिक संत म्हणून ज्यांनापंचक्रोशीत. ओळखले जाते.असे भागवताचार्य श्री ह. भ .प . गुरुवर्य.सुरेश महाराज गोढाळकर हे चालवत आहेत.. .. महाराजांचे चरणी व...अशा या थोर पवित्र पुण्यवान भूमीस त्रिवार नतमस्तक होऊन शतशः नमन...

# दोन टन प्लास्टिक जप्त, मनपाकडून गोदामावर छापे ; पाच लाखाचे प्लास्टिक जप्त



**लातूर/प्रतिनिधी :** लातूर शहर महानगरपालिकेच्या वतीने प्लास्टिक विरोधातील मोहीम दणक्यात सुरू आहे. या अंतर्गत मंगळवारी(दि. २६) पालिकेकडून प्लास्टिकची साठवणूक करणाऱ्या गोदामावर छापे मारण्यात आले. यात अंदाजे पाच लाख रुपयांचे २ टनहुन अधिक प्लास्टिक जप्त करण्यात आले.विशेष म्हणजे रात्री उशिरापर्यंत या प्लास्टिकची मोजदाद सुरू होती. त्यामुळे जप्त केलेल्या प्लास्टिकचा आकडा आणखी वाढण्याची शक्यता आहे.

शहरात सिंगल युज प्लास्टिक वापरास बंदी आहे.असे असतानाही काही व्यावसायिक व नागरिकांकडून हे प्लास्टिक वापरले जाते. त्यामुळे मनपा आयुक्त श्रीमती मानसी यांच्या आदेशानुसार पालिकेने गेल्या काही दिवसांपासून प्लास्टिक जप्त करण्याची मोहीम सुरू केली आहे. विशेष म्हणजे संबंधितांना आर्थिक दंडही केला जात आहे.

या मोहिमेअंतर्गतच मंगळवारी शहरातील गोदामावर छापे मारण्यात आले. मनपा उपायुक्त डॉ. पंजाबराव खानसोळे यांच्या उपस्थितीत मुख्य स्वच्छता अधिकारी कलीम शेख, स्वच्छता विभाग प्रमुख रमाकांत पिडगे व सर्व मुख्य स्वछता निरिक्षक यांनी ही कारवाई केली. यात सिंगल युज प्लास्टिकचा मोठा साठा हाती लागला. सुमारे २ हजार किलो अर्थात २ टनाहुन अधिक प्लास्टिक जप्त करण्यात आले. सायंकाळी ६ वाजेपर्यंत या प्लास्टिकची मोजदाद सुरू होती.मंगळवारी जप्त करण्यात आलेले प्लास्टिक अंदाजे साडेचार ते पाच लाख रुपयांचे आहे.

प्लास्टिकचा वापर वाढत आहे. व्यावसायिक आणि नागरिकांनी पर्यावरण रक्षणासाठी या प्लास्टिकचा वापर बंद करावा,असे आवाहन मनपाच्या वतीने करण्यात आले आहे. नागरिक व व्यावसायिकांनी प्लास्टिक वापर बंद केला नाही तर पालिकेची ही मोहीम यापुढेही सुरूच राहणार असून दंडात्मक कारवाई केली जाईल, असा इशारा पालिकेकडून देण्यात आला आहे.

## उत्कृष्ट सार्वजनिक ग्रंथालय आणि उत्कृष्ट ग्रंथालय कार्यकर्ता पुरस्कारासाठी प्रस्ताव सादर करण्याचे आवाहन

**लातूर/प्रतिनिधी :** राज्य शासनाच्या उच्च व तंत्र शिक्षण विभागांतर्गत ग्रंथालय संचालनालयाकडून राज्यातील शासनमान्य सार्वजनिक ग्रंथालयांचा गुणात्मक विकास व्हावा, ग्रंथालयांकडून जनतेला अधिक चांगल्या ग्रंथालय सेवा उपलब्ध करुन द्याव्यात, वाचन संस्कृती वृध्दींगत करण्यासाठी प्रोत्साहन मिळावे, या उद्देशाने डॉ. बाबासाहेब आंबेडकर उत्कृष्ट ग्रंथालय पुरस्कार, तसेच ग्रंथालय चळवळीतील कार्यकर्ते व सेवक यांना भारतीय ग्रंथालय शास्त्राचे जनक डॉ. शियाली रामामृत रंगनाथन यांच्या नावाने डॉ. एस. आर. रंगनाथन उत्कृष्ट ग्रंथालय कार्यकर्ता व सेवक (ग्रंथमित्र) पुरस्कार देण्यात येतो. या पुरस्कारासाठी ३० सप्टेंबर, २०२५ पर्यंत अर्ज सादर करण्याचे आवाहन करण्यात आले आहे.

राज्यातील शहरी व ग्रामीण विभागातील अ, ब, क, आणि ड वर्गातील उत्कृष्ट शासनमान्य सार्वजनिक ग्रंथालयांना अनुक्रमे रुपये १ लक्ष रुपये, ७५ हजार रुपये, ५० हजार रुपये आणि २५ हजार रुपये रोख रक्कम आणि प्रमाणपत्र देवून गौरविण्यात येते. तसेच राज्यातील एक राज्यस्तरीय उत्कृष्ट कार्यकर्ता व एक राज्यस्तरीय उत्कृष्ट ग्रंथालय सेवक यांना प्रत्येकी ५० हजार रुपये रोख रक्कम आणि प्रमाणपत्र तसेच राज्यातील प्रत्येक महसूल विभागातील प्रत्येकी एक उत्कृष्ट कार्यकर्ता व उत्कृष्ट सेवक यांना प्रत्येकी २५ हजार रुपये रोख रक्कम आणि प्रमाणपत्र देवून गौरविण्यात येते.

सन २०२४-२५ या वर्षातील पुरस्कारासाठी इच्छुक ग्रंथालये, कार्यकर्ते व सेवक यांनी आपले विहित नमुन्यातील तीन प्रतीतील अर्ज ३० सप्टेंबर, २०२५ पर्यंत आपल्या जिल्हा ग्रंथालय अधिकारी कार्यालयाकडे सादर करण्याचे आवाहन राज्याच्या ग्रंथालय संचालनालयाचे प्रभारी ग्रंथालय संचालक अशोक मा. गाडेकर यांनी केले आहे.

# जगद्गुरू रामानंदाचार्य नरेंद्राचार्य महाराजांना महाराष्ट्र भूषण पुरस्काराने गौरविण्यात यावे

## आ. अभिमन्यू पवारांची मुख्यमंत्र्यांकडे मागणी..



**औसा/प्रतिनिधी :** जगद्गुरू रामानंदाचार्य नरेंद्राचार्य महाराज नाणीजधाम यांच्या सामाजिक, धार्मिक, शैक्षणिक, राष्ट्रीय कार्याबद्दल त्यांचा महाराष्ट्र शासनाच्या वतीने ‘‘महाराष्ट्र भूषण‘‘ पुरस्कार देऊन यथोचित गौरव करण्यात यावा अशी मागणी आमदार अभिमन्यू पवार यांनी (दि.२६) रोजी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्याकडे केली आहे. यावेळी आध्यात्मिक, धार्मिक, सामाजिक, शैक्षणिक आणि आरोग्य क्षेत्रात महाराजांच्या खूप मोठे कार्य असल्याचे नमूद करून महाराष्ट्रभूषण पुरस्काराने त्यांचा सन्मान व्हावा ही माझ्यासहित लाखो अनुयायांची भावना असल्याचे आमदार अभिमन्यू पवार यांनी निवेदनात म्हटले आहे.

‘‘तुम्ही जगा आणि दुसऱ्याला जगवा हा अखिल प्राणिमात्राचा उन्नतीचा कल्याणाचा मंत्र समाजाला देत त्यांनी आपल्या लाखो अनुयायांमार्फत जनसेवेची चळवळ उभी केली आहे.‘‘ब्लड इन नीड ही योजना सुरु करून हजारो व्यक्तींना रक्त पुरवठा उपलब्ध करून दिला. सन २०१६ मध्ये महारक्तदान शिबिराचे आयोजन करून त्यांनी केवळ १६ दिवसात १३६२७२ रक्त बाटल्यांचे विक्रमी रक्तदान आपल्या अनुयायांच्या माध्यमातून केले व शासनाच्या रक्तपेढ्यांना विनामूल्य सदरील रक्त पुरवठा उपलब्ध करून दिला. वेद पाठशाळेच्या माध्यमातून धार्मिक उत्सव व नितीमुल्याचे जपणुकीचे मौलिक कार्य त्यांनी सुरु केले. अति दुर्गम भागातील गोरगरीब विद्यार्थ्यांना इंग्रजी माध्यमाचे विनामूल्य शिक्षण मिळावे यासाठी शासनाची आर्थिक मदत न घेता नर्सरी ते पदविका शिक्षणसाठी संस्था सुरु करून क्रीडा कला आदी गुणांना वाव देण्यासाठी त्यानुषंगाने सुविधा उपलब्ध करून देऊन संस्थेच्या माध्यमातून आदर्श भारतीय नागरिक घडवण्याचे काम सुरु केले. रुग्ण सेवेसाठी सन २०१० पासून राष्ट्रीय महामार्गावर पिठाच्या माध्यमातून २४ तास मोफत रुग्णवाहिकासेवा उपलब्ध करून दिली व त्यामाध्यमातून २७ हजार पेक्षा अधिक अत्यवस्थ रुग्णांना वेळेवर उपचार उपलब्ध झाले.

कोविड संसर्गाच्या राष्ट्रीय महामारीच्या कालावधीत महाराष्ट्र शासनाच्या मतदतीसाठी सदर पिठाच्या माध्यमातून अनेक रुग्णवाहिका कोविड रुग्णाच्या सेवेसाठी उपलब्ध करून दिल्या. पिठाच्या माध्यमातून आवाहन करून अनुयायामार्फत कोविड महामारीच्या कालावधीत पंतप्रधान सहाय्यता निधी व मुख्यमंत्री सहाय्यता निधी साठी भरीव आर्थिक सहाय्य उपलब्ध करून दिले, पूर, महामारी, भूकंप, व इतर नैसर्गिक आपत्तीत त्यांचे हजारो अनुयायी मदतीसाठी तत्परतेने कार्यरत असल्याचे व पिडीत कुटुंबापर्यंत मदत उपलब्ध करून देण्याचे कार्य केले आहे. मृत्यूनंतर अवयवदान करण्याबाबत समाजाला प्रेरित करून त्यांचे अर्ज भरून घेतले आणि त्यांच्या अनेक अनुयायांनी आपले अवयव दान केले आहेत. नर्मदा परिक्रमा करीत असलेल्या भाविक भक्तासाठी विनामूल्य भोजन आणि निवास व्यवस्था नर्मदातीरी सुरु केलेली आहे. दारु जुगाराच्या अधिन गेलेल्या ५ लक्ष पेक्षा अधिक व्यसनाधीन नागरिकांची समुपदेशनाच्या माध्यमातून व्यसनमुक्ती करून त्या कुटुंबाना आधार दिला आहे.असे आपल्या निवेदनात आमदार अभिमन्यू पवार यांनी नमूद केले करीत जगद्गुरू रामानंदाचार्य नरेंद्राचार्य महाराज नाणीजधाम यांच्या सामाजिक, धार्मिक, शैक्षणिक, राष्ट्रीय कार्याबद्दल त्यांचा महाराष्ट्र शासनाच्या वतीने ‘‘महाराष्ट्र भूषण‘‘ पुरस्कार देऊन यथोचित गौरव करण्यात यावा अशी मागणी केली आहे.

# बुद्धीची देवता: गणपती

संपूर्ण जनतेच्या ममत्त्वाचा, दैवत्वाचा, अस्मितेचा, श्रद्धाळू असा हा एकमेव गणेश. गणरायाचे आगमन म्हणजे सर्वांसाठी आनंदाची पर्वणीच असते. जोरदार सरींची बरसात झेलून सुखावलेले समस्त जीव आता उत्सव पर्वामध्ये चिंब भिजण्यासाठी सज्ज झाले आहेत. विघ्न दूर करून सुखाची चाहूल देणाऱ्या बाप्पाचे आज आगमन झाले. ऐलमा, पैलमा गणेश देवा, माझा खेळ मांडू दे करीन तुझी सेवा... अवतीभवतीचा आनंद व उत्साहाच्या हिरव्यागार वा-तावरणात भाविकांनी गणेशाचे स्वागत केले.प्रत्येकाच्या घरोघरी उत्सवाची सज्जता सुरू असल्यामुळे भारलेले वातावरण अनुभवायला मिळत असते. वास्तविक गणेश हा विद्येचा देव आणि ज्ञानाचा अधिपती. सण आणि उत्सव साजरे करताना आपण संस्कृती परंपरेचा प्रवाह पुढे नेत असतोच. आपल्या समाज सुधारकांनी मात्र उत्सव आणि परंपरा यांचा विचार राष्ट्रासाठी कसा केला याचे उत्तम उदाहरण म्हणजे सार्वजनिक गणेशोत्सव. सार्वजनिक गणेशोत्सवाचा उल्लेख जेव्हा जेव्हा होतो तेव्हा लोकमान्य टिळकांचे स्मरण होणे स्वाभाविक आहे.

गणेशोत्सवाची सुरुवात झाली ती भारतीयांना एकत्र आणण्यासाठी, विचारांची देवाणघेवाण करण्यासाठी. १८९३ साली स्थापन केलेला सार्वजनिक गणेशोत्सव म्हणजे युवकांमध्ये राष्ट्रतेज जागृत करण्याचा अनोखा प्रयत्न. जो पुढे जाऊन यशस्वी झाला. एका मूर्तीच्या प्राणप्रतिष्ठापासून सुरुवात होऊन घराघरांत, मंडपात गणराज विराजमान झाले आहेत. जीवनात अनोखे रंग भरणारा, स्नेह, प्रेम वाढवणारा हा उत्सव आहे. आजच्या घडीचे संघटन, शक्तीचे प्रतीक दर्शवितो. हे सर्व करत असताना या आनंदमय वातावरणात सर्व समाजाने एकत्र यावे त्यांच्यात बंधुभाव वाढीस लागावा, एकमेकांप्रती प्रेम, आपुलकी निर्माण व्हावी या उदात्त हेतूने सार्वजनिक गणेशोत्सवाची सुरुवात करण्यात आली.

चातुर्मासात श्रावणसरींनी आलेला पाऊस आपल्याबरोबर हिंदू सणांना घेऊन येतो. हिंदू धर्मातील ईश्वराची रूपे वेगळी असली तरी शेवटी सर्वांचा ईश्वर एकच आहे. हे निस्सीम सत्य विसरता कामा नये. चौदा विद्या, चौसष्ट कलेचा अधिपती असलेल्या श्रींचे आगमन सर्वांसाठी आनंदरुपी अमृत सोहळा आहे. बाप्पा आला रे आला... किती जिव्हाळ्याचा आतून येणारा आवाज. गोंडस, गोजिरवाणा, लोभस, लडिवाळ, सर्वांच्या लाडक्या गणपती बाप्पाचे आगमन वाजत गाजत मोठ्या उत्साहात घरोघरी, गल्लोगल्ली, शहरात तसेच गावात झाले आहे. घरामध्ये गणपती बाप्पा जेव्हा विराजमान होतात तेव्हा घराचे मंदिर आपोआपच होऊन जाते. या पवित्र वातावरणात कधी दहा दिवस संपतात तेच समजत नाही. यामध्ये गौरी आगमन, गौरी पूजन व गौरी गणपती विसर्जन हे सण उत्सव आनंदात साजरे केले जातात. आपल्याकडे सर्व असतातच यासाठीच की मरगळलेल्या मनाला पुन्हा चैतन्य ऊर्जा मिळावी ही ऊर्जा मिळताना मनामध्ये पवित्र भाव असावा. अनेक पिढ्यान पिढ्यांपासून बाप्पाची अतिशय मनोभावे पूजा केली जाते. लहान मुलांपासून ते वडीलधाऱ्यापर्यंत श्री गणेशाचे आगमन झाल्यावर प्रत्येकजण बाप्पाची सेवा करण्यात दंग होऊन जातो. कारण गणेश दैवत हे बुद्धीची देवता आहे. तसेच तो विघ्नहर्ता ही आहे. प्रथम पूजेचा शुभारंभाचा मान श्री गणेशाकडे जातो. अशा गणाचा अधिपती असलेल्या श्री गणेशाचे स्थान आपल्या आयुष्यात अनन्यसाधारण आहे. बाप्पाचा आवडता प्रसाद मोदक. बाप्पाच्या नैवेद्याचा आधीच जिभेवर उड्या मारायला लागतो. या दिवसात एक वेगळेच वातावरण न्याहाळायला मिळत असते. बाप्पा विराजमान झाल्यावर विविध सुगंधी अगरबत्त्यांचा दरवळणारा सुवास, शेणाने सारव-लेले अंगण, मातीच्या भिंतींना केलेली पानाफुलांची रंगरंगोटी, दाराला लावलेले तोरण, रांगोळीने सजलेले अंगण मन प्रसन्न करते. बाप्पाच्या आगमनामुळे रक्ताची नाती जवळ येतात, उत्साह, आनंदाचे वातावरण निर्माण होते.

वक्रतुंड महाकाय, सूर्यकोटि समप्रभ। निर्विघ्न कुरुमे देव, सर्वकार्येषु सर्वदा! गोलाकार सोंडेचा, विशाल शरीराचा, सूर्या समान तेजस्वी अशा विघ्नहर्ताची आमच्यावर कृपा असावी. आपल्या या वैदिक संस्कृतीमध्ये एक दयाळू देवता श्री गणेश विघ्नहर्ता बुद्धिवंत, सामर्थ्यवंत, शक्तीवन्त, रूपवंत देवता आहे. गणेश या संस्कृत शब्दाप्रमाणे अर्थ गण म्हणजे समूह तर ईश म्हणजे परमेश्वर. गणपती म्हणजे प्राणिमात्रांच्या समूहाचे रक्षण करणारा रक्षक. गणेश हा महादेव आणि पार्वतीचा पुत्र आहे. याबद्दलची गोष्ट प्रत्येकाला माहीतच आहे. भाद्रपद शुक्ल चतुर्थीपासून वेद व्यासांनी डोळे मिटवून भागवत कथा सलग दहा दिवस गणपतीला ऐकवली. जी गणपतीने आपल्या दाताने लिहिली. दहा दिवसानंतर जेव्हा व्यासांनी डोळे उघडले तेव्हा त्यांनी पाहिले की, गणेश एका जागी सतत बसून लिहिल्यामुळे अतिशय उष्णता शरीरात निर्माण झाली. त्यामुळे जवळील पाण्याच्या कुंडात वेद व्यासांनी त्यांना थंड केले. त्यामुळेच भाद्रपद शुक्ल चतुर्थीला गणरायाची स्थापना केली जाते आणि शितल करण्यासाठी अनंत चतुर्दशीला विसर्जन केले जाते.



## सुखी जीवनाची चार सुत्रे

जगातल्या कुठल्याही प्रश्नावर समाधान नाही असे होऊच शकत नाही. त्यात मानव तर विशेष शक्तींचा धनी आहे. जर मानवाकडे निष्ठा व प्रयत्न करण्याची तयारी असेल तर सर्व शक्य आहे. जीवनाला उपयुक्त बनवण्याचे अनेक उपाय आहेत. त्यापैकी चार गोष्टी अशा आहेत, ज्याचा जीवनात समावेश केल्यामुळे बहुतांशी अडचणी सुटू शकतात.

या चार गोष्टींना जीवनाचे सार म्हटले जाऊ शकते. सर्व विकारांचा त्याग, कपट सोडून साधेपण स्वीकारणे, बंधनातून मुक्त होण्याचे साहस व जीवनात अध्यात्मवादाचा समावेश केला तर मानवाचे व्यर्थ जीवन उपयुक्त बनेल. त्याच्या जीवनात आनंद व उल्हास, शांती व समाधानात वाढ होईल. विकार मानव जीवनातील सर्वात मोठा अडथळा आहे. हा दोष मानवाला फक्त विकृती देतो. मानवास उदारता, दान, दया, प्रेम किंवा करुणा प्रवृत्तींपासून वंचित करतो म्हणून त्याच्या भौतिक इच्छा एवढ्या वाढतात की, संग्रह करण्यात त्यास योग्य-अयोग्य, कर्तव्य-अकर्तव्य, आपले-त्रयस्थ, शोषण-पोषण कशाचेच भान राहत नाही. आपला फायदा व मोहासमोर त्यास सर्व आदर्श, सर्व मर्यादा व धोरणं व्यर्थ वाटू लागतात. अशा विकारी मानवाच्या जीवनात शोक-संताप व अशांती, असंतोषाशिवाय दुसरे काय मिळू शकते? विकृती मानवाचा फार मोठा दोष आहे, याचा त्याग केला पाहिजे. उदारता व महानतेची वृत्ती मानवासाठी दोन अलंकार मानले गेले आहेत. ते अंगीकारण्यातच त्याचे भले आहे. उदारतेचा गुण आपल्या इतर गुण त्यागांना प्रोत्साहित करतो. त्याग तपश्चर्यापेक्षा कमी नसतो. त्यागी पुरुष कुठल्याही वस्तुचा संग्रह, धोरण व आदर्शाविरुद्ध नाही. उदारता परमार्थासाठी अर्जित केली जाते. उदार पुरुष निति नियमाने मिळवलेल्या पैशाने सुखी व समाधानी असतो. अशा लोकांचे प्रश्न आपोआप सुटतात.

गणेश उत्सव हा बाल आणि तरुणांसाठी एक आनंदोत्सवच असतो. अशा वातावरणात कल्पनाशक्तीला वाव मिळतो. कौशल्याच्या सादरीकरणाची संधी मिळते. नवनवीन मित्र-मैत्रिणी गवसतात, एकत्र काम केल्यामुळे सुसंवादाला चालना मिळते. सगळे एका पा-तळीवर येऊन काम करत असल्यामुळे जवळीकता वाढते. एकप्रकारे या अनौपचारिक वातावरणात मैत्री फुलते. दोस्ती घट्ट होते. एकंदरीत संपूर्ण समाज या महोत्सवात विरघळून जातो, रममान होतो.

श्री गणेश विद्येची देवता आहे. तसेच ती कलेची ही देवता आहे. त्यामुळे कलाकार मंडळी ही गणेश उत्सवामध्ये आपली कला सादर करण्यासाठी रंगून गेलेले असतात. गणपतीसमोर ठेवलेले लाडू, मोदक असे गोड पदार्थ लहान मुलांपासून ते मोठ्यांपर्यंत सर्वांनाच आवडतात. त्यामुळे गणेशोत्सवामध्ये बाळ गोपाळही रमून जातात. काहींच्या घरी दीड दिवसाचे गणपती तर काहींच्या घरी सात दिवसांचे गणपती असतात. पंचमी दिवशी दीड दिवसाचे गणपती जातात. त्यादिवशी ऋषीपंचमी साजरी केली जाते. याच दिवसात गौरीचे आगमन होते. गौरी पूजन आणि विसर्जनाचा सोहळा पार पडतो. काही गणपतीचे विसर्जन गौरी सोबतच होते. अनंत चतुर्दशीच्या दिवशी सर्वच गणपतीचे विसर्जन होते. गणपती बाप्पा मोरया... पुढच्या वर्षी लवकर या. गणपती गेले गावाला, चैन पडेना आम्हाला.

– रसिका मेंगळे



## अविश्वासाचं फळ



गावातल्या एका माणसाचा कुत्रा मोठा गुणी, ईमानी होता. सर्व गावाचं रक्षण करीत असे. काही कारणांनी त्या माणसाला आ-पला कुत्रा सावकाराला विकावा लागला. एक रात्री सावकाराच्या घरी चोर आला. पैशाची थैली घेऊन पळून जाणाऱ्या चोराला कुत्र्यानं पाठलाग करून धरले व त्याचा कडकडून चावा घेतला. दुसऱ्या दिवशी सावकाराचा धोतराचा सोगा तोंडात धरून ओढत त्यानं सावकाराला त्या पडक्या विहिरीपाशी नेलं. तिथं चोरानं पैशाची थैली टाकली होती. सावकाराला फार आनंद झाला. त्यानं कुत्र्याचं कौतुक केलं आणि त्याला त्याच्या पहिल्या धन्याकडे पाठवलं. त्याच्या गळ्यात एक चिठ्ठी लिहिली, “हे जनावर अत्यंत ईमानी आहे. तुमचा आधार आहे. त्याला परत पाठवीत आहे.” कुत्रा घरधन्याकडे गेला. त्याला परत आलेला पाहताच धन्याच्या मनात अनेक शंका आल्या. त्याला वाटलं, “हा ईमानी म्हणवणारा कुत्रा सावकाराचं दार सोडून माझ्याकडे कसा आला.” त्यानं कुत्र्याच्या डोक्यावर काठीनं प्रहार केला. ते जनावर मरून पडलं. पाहतो तो त्याच्या गळ्यात होती चिठ्ठी. ती वा-चताच सारा उलगडा झाला. अविश्वास आणि उता-वीळपणाचं फळ मिळालं.

**कथा उपदेश :**
**अविश्वास घातक ठरतो.**

## स्वस्थ त्वचेकरता काय खावे? डॉक्टर टीप्स



**दलिया**–सकाळचा नाश्ता हा संपुर्ण दिवसभरातुन महत्वाचा आहार असतो. आणि तरीही आपल्यातले बरेचजण या गोष्टीकडे कानाडोळा करतात. जेव्हा तुम्ही नाश्ता करत नाही तेव्हा एक प्रकारे तुम्ही तुमच्या चेहे-याला स्वस्थ ठेवण्याची एक चांगली संधी गमावता.

दलीया डोनट्स्, बगेल्स, आणि जेलीपेक्षा बरेच जास्त गुणधर्म दलीयात आहे. ब्रेकफास्ट न केल्याने तुमच्या खाण्यात जी कमतरता राहाते त्यामुळे तुमच्या त्वचेवर विपरीत परीणात होवु शकतो. म्हणुन जर तुम्ही तुमच्या त्वचेला स्वस्थ आणि एकसारखी ठेवु ईच्छिता तर सकाळी सकाळी नाश्त्याच्या वेळी दलीयाचे सेवन अवश्य करा.

**(क्रमश. )**



## विनोद




**मुन्ना : तुला जपानी बोलता येते?**
**पप्पू : हो.**
**मुन्ना : बोल बरं.**
**पप्पू : जपानी.**

## संदेश

Santa Banta Hindi Jokes
Banta: Santa, itna udhaas kyu baita hai?
Santa: yaar betting mein maine 2000 gavaa diyaa :-(
Banta: kaise?
Santa: India pe 1000 rupaiye ka bet lagaaya tha aur India ne match haar gaya
Banta: lekin 2000 kaise?
Santa: aaj us match ka highlights daale. India pe ummeed rakh ke phir 1000 dala tha.

## सुविचार

जर विज्ञानावर शहाणपणाचे नियंत्रण नसेल तर ते भ्रमिष्टपणाने वागेल.


**– स्पॅनिश म्हण**



**संस्कृत सुभाषित**
**अमित्रमुपसेवेत विश्वस्तवदविश्वसन्**
**प्रियमेव वदेन्नित्यं नाप्रियंकिंचिदाचरेत्।।**
**(शांतीपर्व, अध्याय १०३, श्‍लोक ९, महाभारत)**

**अर्थ** –शत्रूवर विश्वास न ठेवता विश्वास ठेवल्याचा बहाणा करून त्याच्या कलाने वागावे. त्याच्याशी नेहमी गोड बोलावे. त्याला न रुचण-री गोष्ट करू नये.

# मनोरंजक महाशब्दकोडे



### आडवे शब्द

१. जमिनीवरचे प्राणी, पशू
४. अग्रलेख
९. पहारा करणारा
१०. प्रचंड, तीव्र
११. नजरेचा तीर
१६. गालबोट
१७. उडाणटप्पूंची चैन
१८. बादशहाचा प्रधान
२०. सबब
२१. नूतन
२२. मृतिका, मृदा
२३. निरर्थक
२४. शृंखला
२६. कर्ण
२८. जास्तीत जास्त
२९. हाताचा तळवा
३२. दिखाऊ, वरपांगी
३४. अवघा, सगळा
३६. गार, थंड
३७. प्रत्येक ठिकाणी, सर्वत्र
३८. वंचित
३९. टक, दृष्टी
४२. दोस्त
४३. अंत:करण
४४. जाणकार
४६. तासाशी गुणोत्तर
४७. अथवा
४८. युवती
५०. जानकी
५१. आजार, रोग
५५. लेंगा
५७. परिस्थिती
५८. अंगठी घालण्याचे बोट
५९. मूळ आधार
६०. आजच्या आधीचा दिवस
६१. गोव्यातील दैवत
६२. हालचालीवरील नजर
६४. गवत, गुरांचे खाद्य
६६. बस्तान
६७. शहर, गाव
६९. स्वच्छ, चकचकीत
७१. श्रीमंत
७२. शत्रूला गाठण्याची चिंचोळी जागा
७३. बासरी
७४. उद्याच्या नंतरचा दिवस
७७. वृक्ष
७८. बघू नये अशी स्वयंपाकाची जागा!
७९. जयाचा नामघोष

### उभे शब्द

१. 'सिने में ---, आंखो ने तुफान सा क्यों है, इस शहर में हर शख्स परेशानसा क्यों है'
२. पक्के वचन
३. सभ्य माणसांचे 'व्यसन'!
४. संकटाच्या वेळी
५. मोदकाचे आवरण
६. आमंत्रक, कुटुंबोप्रमुख
७. संकटातून निभावणे
८. जवळचा घरातील शत्रू
९. गोव्याची राजधानी
१०. बारीक वाळू
१२. चांगला
१४. योग्य, बरोबर
१५. चोख, निर्भेळ सोने
१७. कण्यातील हाड
१९. पाताळ
२२. आईचा भाऊ
२३. ऐनवेळी कच खाणे
२५. दुष्ट, खल
२७. नुकतेच जन्मलेले
२८. कर देण्यास योग्य
३०. मौल्यवान खडा (हिंदी)
३१. मालवणी गोडी शेव
३३. अंगातील मस्ती, जोश
३५. शाहरुखचे फिल्मी नाव
४०. रम्य, मनोहर
४१. तेंडुलकरांचे वादग्रस्त नाटक 'घाशीराम ----'
४२. पैजेत पीळ देण्याची-उतरवण्याची
४४. जननी
४५. शाळकरी मुलांना, नोकरदारांना हवाहवासा दिवस
४६. धातूचा धागा
४९. भारतीय चलन
५०. वेस, हद्द
५२. गायींचे पिल्लू
५३. लक्ष्मीवल्लभ
५४. ठेकेदार
५६. निकट
५७. चलनवलन
५८. अगम्य
५९. बाजीप्रभूंनी लढवलेली जागा
६२. पलीकडे
६३. समशेर
६५. रक्षाबंधनाचा धागा
६६. अटीची भाषा
६८. डोंगरी किल्ला
७०. तपश्चर्या, साधना
७३. पाण्याचा प्रवाह
७५. मातीचा कण
७६. इंग्रेजी वर्णमालेतील शेवटून दुसरे अक्षर

### आडवे उत्तर

१.जनावर ४.संपादकीय ९.पहारेकरी ११.जबरदस्त १३.नयनबाण १६.तीट १७.मजा मारणे १८.वजीर २०.कारण २१.नवा २२.माती २३.अर्थहीन २४.साखळी २६.कान २८.कमाल २९.करतल ३२.वरवर ३४.सारा ३६.शीतल ३७.जागोजाग ३८.पारखा ३९.नजर ४२.मित्र ४३.मन ४४.माहीतगार ४६.ताशी ४७.वा ४८.तरूणी ५०.सीता ५१.विकार ५५.पायजमा ५७.हालहवाल ५८.अनामिका ५९.पाया ६०.काल ६१.रवळनाथ ६२.पाळत ६४.चारा ६६.जम ६७.नगर ६९.लखलखीत ७१.मालदार ७२.खिंड ७३.पावा ७४.परवा ७७.तरू ७८.भटारखाना ७९.जयजयकार

### उभे उत्तर

१.जलन २.वचन ३.चहा ४.संकटकाळी ५.पारी ६.यजमान ७.तरणे ८.अस्तनीतील निखारा ९.पणजी १०.रेती १२.बरवा १४.यर्थाथ १५.बावनकशी १७.मणका १९.रसातल २२.मामा २३.अवसानघात २५.खल २७.नवजात २८.करपात्र ३०.रतन ३१.खाजा ३३.रग ३५.राज ४०.रमणीय ४१.रुपाया ५०.सीमा ५२.कालवड ५३.श्रीनाथ ५४.मुकादम ५६.जवळ ५७.हालचाल ५८.अनाकलनीय ५९.पावनखिंड ६२.पार ६३.तलवार ६५.राखी ६६.जरतर ६८.गड ७०.तप ७३.पाट ७५.रज



# क्रीडा विश्व



## थोडक्यात/ संक्षिप्त

### भारतीय टीमच्या जर्सीवर पुढचा स्पॉन्सर कोण? 'हे' श्रीमंत व्यावसायिक ठरू शकतात मानकरी

नवी दिल्ली -विश्व क्रिकेटमध्ये सध्या चर्चेचा विषय म्हणजे भारतीय क्रिकेट टीमची जर्सी पुढील सत्रासाठी कोण स्पॉन्सर करणार? ड्रीम११च्या कराराच्या आधीच समाप्तीमुळे आता बोर्ड नवीन स्पॉन्सर शोधत आहे. बीसीसीआयचे सचिव देवजीत सैकिया यांनी स्पष्ट केले की, ऑनलाइन गेमिंग प्रमोशन आणि रेग्युलेशन बिल २०२५ पास झाल्यानंतर ड्रीम११सह जर्सी स्पॉन्सरशिपची करार रद्द करण्यात आली आहे. भविष्यात बीसीसीआय अशा कोणत्याही ऑनलाइन गेमिंग कंपनीशी करार करणार नाही. आता बोर्डकडे नवीन जर्सी स्पॉन्सर शोधण्याची जबाबदारी आहे, नाहीतर आशिया कपमध्ये टीम इंडिया कोणत्याही स्पॉन्सरशिवाय खेळायला उतरू शकते.श्रीमंत व्यावसायिक स्पॉन्सरशिपवर लावू शकतात पैज भारतीय क्रिकेट बोर्ड जगातील सर्वात श्रीमंत बोर्ड असल्यामुळे त्यासोबत जोडणे कोणत्याही व्यवसाय गटासाठी मोठी प्रतिष्ठा ठरेल. विराट कोहली, रोहित शर्मा, जसप्रीत बुमराह, शुभमन गिल यांसारख्या स्टार्सच्या जर्सीवर स्पॉन्सरिंग ही संधी फार आकर्षक आहे.

टाटा ग्रुप-टाटा ग्रुपने भारतीय क्रिकेटसह महिला क्रिकेट, इंडियन प्रीमियर लीग, महिला प्रीमियर लीग आणि इतर क्रीडा उपक्रमात मोठे योगदान दिले आहे. बोर्डसह जर्सी स्पॉन्सरशिप मिळवली तर काही गैरसा वाटण्यासारखे नाही.

अडानी ग्रुप

अडानी ग्रुप महिला क्रिकेटमध्ये सक्रिय आहे, दिल्ली प्रीमियर लीगचे स्पॉन्सर आहे आणि यूएई लीग (घ्थ्ऊ२०) मध्ये टीमसह आहे. पुरुष क्रिकेटमध्ये अद्याप त्याचा प्रभाव तुलनेने कमी आहे.

रिलायंस जियो (मुकेश अंबानी)

रिलायंस इंडस्ट्रीज व जियो प्लेटफॉर्मने मुंबई इंडियन्ससारख्या आयपीएल टीम्सची मालकी घेतली आहे. क्रिकेट क्षेत्रातील त्यांचा प्रभाव जर्सी स्पॉन्सरशिपसाठी नैसर्गिक पर्याय ठरवतो.

महिंद्रा ॉ महिंद्रा

आनंद महिंद्रा सतत खेळाडूंना प्रोत्साहित करतात. वनडे व आशिया कप २०२३ मध्ये कंपनी ब्रॉडकास्टसह को-पावर्ड स्पॉन्सर होती. ड्रीम११च्या गेल्यानंतर ही संधी महिंद्रासाठी मोठा खेळ ठरू शकतो.

टोयोटा

टोयोटाने क्रिकेट ऑस्ट्रेलिया, इंग्लंड क्रिकेट बोर्ड, इंटरनॅशनल ओलंपिक कमिटी, फीफा क्लब वर्ल्ड कप आणि इतर स्पर्धांचा स्पॉन्सर म्हणून मोठा प्रभाव निर्माण केला आहे. भारतातही टोयोटा जर्सी स्पॉन्सरशिपसाठी पुढे राहू शकते.

इतर संभाव्य कंपन्या

गड्थ, पेप्सी तसेच फिनटेक कंपन्या नशीवहर, अपसशश्र जपश, ञ्ञु देखील संधी मिळाली तर दांव लावू शकतात. २०२३ मध्ये ड्रीम११ने ३५८ कोटी रुपयांच्या कराराद्वारे बीसीसीआयशी भागीदारी केली होती, ज्यामध्ये प्रत्येक घरेलू सामन्यासाठी ३ कोटी आणि प्रत्येक विदेशी सामन्यासाठी १ कोटी रुपये समाविष्ट होते. रिपोर्टनुसार, बीसीसीआय लवकरच जर्सी स्पॉन्सरसाठी टेंडर जाहीर करेल. मात्र, जर ९ सप्टेंबरपूर्वी करार झाला नाही तर भारतीय टीम आशिया कपमध्ये कोणत्याही स्पॉन्सरशिवाय खेळायला उतरू शकते.

***

### आशिया कप मध्ये पहिल्यांदाच खेळणार टीम, पंजाबी खेळाडूला मिळाली कॅप्टन्सी

दिल्ली-आशिया कप स्पर्धेसाठी आता सर्वांची उत्सुकता शिगेला पोहोचली आहे. बीसीसीआयने यासाठी टीम इंडियाची घोषणा केली आहे. सूर्यकुमार यादवच्या नेतृत्वाखाली भारतीय संघ खेळेल. अशातच आता भारतापाठोपाठ ओमान देशाने देखील आपली टीम जाहीर केली आहे. आशिया कपसाठी ओमानने आपल्या १७ खेळाडूंच्या संघाची घोषणा केली आहे. अनुभवी फलंदाज जतिंदर सिंग संघाचे नेतृत्व करेल.

ओमानचे सामने कसे असतील?

आशिया कपसाठी ओमान क्रिकेट संघाला गट अ मध्ये स्थान देण्यात आले आहे. त्यांचा पहिला सामना १२ सप्टेंबर रोजी पाकिस्तानी संघाविरुद्ध असेल. त्यानंतर १५ सप्टेंबर रोजी यूएईविरुद्ध आणि १६ सप्टेंबर रोजी भारतीय संघाविरुद्ध सामना होईल. आगामी स्पर्धेसाठी संघाची घोषणा करण्यात आली असून जतिंदर सिंग यांच्याकडे कर्णधारपदाची जबाबदारी सोपवण्यात आली आहे.आशिया कपसाठी ओमानचा संघ -जतिंदर सिंह (कॅप्टन), हम्माद मिर्जा, विनायक शुक्ला (विकेटकीपर), सुफियान यूसुफ (विकेटकीपर), आशीष ओडेडेरा, आमिर कलीम, मोहम्मद नदीम, सुफियान महमूद, आर्यन बिष्ट, करण सोनावले, जिक्रिया इस्लाम, हसनैन अली शाह, फैसल शाह, मोहम्मद इमरान, नदीम खान, शकील अहमद, समय श्रीवास्तव.दरम्यान, ओमानच्या संघात अनुभवी आणि युवा खेळाडूंचा चांगला समतोल साधलेला दिसतो. जतिंदर सिंग आणि मुहम्मद इम्रान यांसारखे अनुभवी खेळाडू संघाला स्थिरता देतील, तर आशिष ओदेडेरा आणि सामय श्रीवास्तव यांसारख्या युवा खेळाडूंना मोठ्या आंतरराष्ट्रीय स्पर्धेत खेळण्याची संधी मिळेल.

## मराठमोळ्या शर्वरीचा डंका

# जागतिक तिरंदाजी युवा अजिंक्यपद स्पर्धेत जिंकले गोल्ड मेडल





विनिपेग-कॅनडातील विनिपेग इथे झालेल्या १८ वर्षाखालील महिला रिकर्व्ह स्पर्धेत पुण्याच्या मराठमोळ्या शर्वरी शेंडेने २०२५ च्या जागतिक तिरंदाजी युवा अजिंक्यपद स्पर्धेत सुवर्णपदकासह भारतीय संघाच्या मोहिमेचा शेवट केला. ऑलिंपिक डॉट कॉमनं दिलेल्या माहितीनुसार १६ वर्षीय शर्वरी ही दीपिका कुमारी (२०११) आणि कोमलिका बारी (२०२१) नंतर महिला रिकर्व्ह प्रकारात तिसरी भारतीय विश्वविजेती ठरली. पात्रता फेरीनंतर २० व्या क्रमांकावर असलेल्या शर्वरीनं तिच्यासमोरील सर्व अडचणींवर मात केली आणि तिच्या उच्च दर्जाच्या प्रतिस्पर्धंयांना हरवून एक संस्मरणीय सुवर्णपदक जिंकलं.

१०-९ नं जिंकला अंतिम सामना : शर्वरीनं उपांत्य फेरीत कोरिया प्रजासत्ताकच्या तिसऱ्या क्रमांकाच्या किम येवोनचा ७-३ असा पराभव करुन अव्वल पोडियममध्ये स्थान मिळवण्याची संधी मिळवली. तर सुवर्णपदकाच्या सामन्यात, सामना अत्यंत रोमांचक होता आणि ५-५ असा बरोबरीत झाला. परिणमी पदकाचा निर्णय शूट-ऑफमध्ये झाला आणि शर्वरीनं संयम राखत १०-९ असा सामना जिंकत सुवर्णपदकावर नाव कोरलं.

काय म्हणाली शर्वरी : या ऐतिहासिक विजयानंतर शर्वरीनं ऑलिंपिक डॉट कॉमला आपली प्रतिक्रिया दिली. ती म्हणाली, ''मी खरोखरच विश्वविजेती आहे का? अरे देवा, हे अद्भुत होतं. मी फक्त एवढाच विचार करत होते की मी माझे सर्वोत्तम प्रयत्न करेन. एक बाण ठरवेल की मी विश्वविजेती होईन की नाही. माझे प्रशिक्षक मला सांगत होते की आत्मविश्वास बाळगा, स्वत:वर विश्वास ठेवा, तुम्हीच विजेता व्हाल.'' तसंच ''मी नेहमीच जागतिक विजेता होण्याचं स्वप्न पाहिलं होतं आणि हे माझे कॅडेट श्रेणीतील शेवटचं वर्ष आहे, म्हणून मला खूप अभिमान वाटत आहे, मला वाटते की मी माझ्या भारताला अभिमानानं उंचावलं आहे,'' असंही तिनं सांगितले.भारताच्या नावावर आठ पदकं : याआधी स्पर्धेत शर्वरीनं १८ वर्षाखालील महिला रिकर्व्ह तिरंदाजी सांघिक स्पर्धेत कांस्यपदक मिळवण्यात आपली भूमिका बजावली. स्पर्धेच्या शेवटच्या दिवशी १८ वर्षाखालील मिश्र रिकर्व्ह प्रकारात चिनी तैपेईचा पराभव करुन गाथा खडके आणि अगस्त्य सिंग यांनी आणखी एक कांस्यपदक जिंकलं. शेवटच्या दिवशी जिंकलेल्या दोन पदकांसह, स्पर्धेत भारताची एकूण पदकांची संख्या आठ झाली आहे, ज्यामध्ये चार सुवर्ण, दोन रौप्य आणि दोन कांस्यपदकं आहेत. दोन वर्षापूर्वी, लिमरिक इथं झालेल्या या स्पर्धेच्या शेवटच्या हंगामात भारतानं सहा पदकं जिंकली होती. जागतिक तिरंदाजी युवा अजिंक्यपद स्पर्धेची पुढील आवृत्ती २०२७ मध्ये तुर्कीच्या अंताल्या इथं होणार आहे.

# रोहितने का सोडले कसोटी क्रिकेट? स्वत: सांगितले मोठे



मुंबई -भारतीय कसोटी आणि टी-२० क्रिकेट संघाचा माजी कर्णधार रोहित शर्मा सध्या चर्चेचा केंद्रबिंदू आहे. रोहित अजूनही क्रिकेटच्या मैदानापासून दूर आहे, तरीही तो चर्चेत आहे. कधी कधी असे म्हटले जाते की रोहित शर्मा आता वनडे क्रिकेटमधूनही निवृत्त होणार आहे, तर कधी असे म्हटले जाते की रोहितला वनडे क्रिकेटच्या कर्णधारपदावरुन काढून टाकले जाऊ शकते. वनडे कर्णधारपदासाठीही दररोज नवीन दावेदार समोर येतात. यादरम्यान, स्वत: रोहित शर्माने कसोटी क्रिकेटमधील निवृत्तीबाबत वक्तव्य केले आहे.

कसोटी आणि टी-२० क्रिकेटमधून रोहित निवृत्त : रोहित शर्मा कसोटी क्रिकेट खेळत नाही किंवा तो टी-२० आंतरराष्ट्रीय स्पर्धेत टीम इंडियाचा भाग नाही. २०२४ मध्ये त्याच्या नेतृत्वाखाली टी-२० विश्वचषक जिंकल्यानंतर त्याने या फॉरमॅटमधून निवृत्तीची घोषणा केली. त्याच वेळी, जेव्हा टीम इंडिया काही दिवसांपूर्वी कसोटी मालिकेसाठी इंग्लंडला जाण्याची तयारी करत होती, तेव्हा त्यानं कसोटी क्रिकेट सोडण्याचा निर्णय घेतला. आता तो फक्त वनडे क्रिकेट खेळत आहे आणि सध्या तो कर्णधार देखील आहे. सध्या भारतीय संघ जास्त वनडे सामने खेळत नाहीये, त्यामुळे रोहितही खेळत नाहीये. अशातच सोमवारी मुंबईत एका कार्यक्रमादरम्यान रोहित पोहोचला आणि त्याने त्याच्या मनातील भावना व्यक्त केल्या.

काय म्हणाला रोहित शर्मा : या कार्यक्रमादरम्यान एक पॅनेल चर्चा आयोजित करण्यात आली होती, ज्यामध्ये रोहित शर्मा म्हणाला, मफ्तुम्हाला कसोटी क्रिकेटसाठी तयारी करावी लागेल. हा असा खेळ आहे ज्यामध्ये तुम्हाला बराच काळ मैदानावर राहावे लागते. कसोटीत तुम्हाला पाच दिवस खेळावे लागते. मानसिकदृष्ट्या ते खूप आव्हानात्मक आणि थकवणारे असते. रोहित शर्माने असेही म्हटले की सर्व क्रिकेटपटू प्रथम श्रेणी क्रिकेट खेळून मोठे झाले आहेत. मात्र यात रोहितने त्याच्या कसोटी निवृत्ती किंवा भविष्यातील योजनांबद्दल काहीही सांगितले नाही.

ऑक्टोबरमध्ये खेळताना दिसू शकतो रोहित : भारतीय क्रिकेट संघ या वर्षी ऑक्टोबरमध्ये ऑस्ट्रेलियाचा दौरा करणार आहे, ज्यात तीन वनडे सामन्यांची मालिका खेळली जाईल. आतापर्यंत, रोहित वनडे संघाचे नेतृत्व करताना दिसत आहे. हो, जर अचानक बदल झाला नाही, तर कमान त्याच्या हातात राहील. ही ती मालिका असेल जेव्हा रोहित शर्मा आणि विराट कोहली बऱ्याच काळानंतर पुन्हा खेळताना दिसतील. या मालिकेनंतर रोहित आणि कोहली खेळत राहतील का की २०२७ च्या वनडे विश्वचषकापर्यंत खेळण्यासाठी ते दुसरा काही निर्णय घेतील? यावर सर्वांचं लक्ष नक्कीच राहील.

### अवनीत कौरने विराट कोहलीच्या लाईकवर पहिल्यांदाच सोडले मौन

मुंबई -विराट कोहलीने आपल्याकडे पाहिले तरी देखील क्रिकेट



फॅन्सला रात्ररात्रभर झोप येणार नाही. जर तुमची सोशल मीडिया पोस्ट विराट कोहलीच्या इन्टाग्राम पेजवरून लाईक केली गेली तर... टीम इंडियाचा स्टार क्रिकेटर विराट कोहली याने काही महिन्यांपूर्वी अभिनेत्री अवनीत कौरच्या एका फॅन पेजवरील पोस्टला लाइक केलं होतं, ज्यामुळे खूप चर्चा झाली होती. आता अवनीतने अप्रत्यक्षपणे या प्रकरणावर आपली प्रतिक्रिया दिली आहे. अवनीतच्या आगामी मलव्ह इन व्हिएतनामफ या चित्रपटाच्या ट्रेलर लाँचवेळी अवनीतने यावर प्रतिक्रिया दिली.

मलव्ह इन व्हिएतनामफ या चित्रपटाच्या ट्रेलर लॉन्चचा कार्यक्रम पार पडला. तिथं अवनीतला प्रश्न विचारण्यात आला की, मऑनलाईन सेलिब्रिटींकडून इतकं लक्ष आणि कौतुक मिळाल्यावर कसं वाटतं?फ त्यावर हसत अवनीत म्हणाली, प्रेम मिळत राहो, असं एका वाक्यात अवनीत प्रतिक्रिया दिली.


विराट कोहलीने मे महिन्यात अवनीत कौरच्या एका फॅन पेजवरील पोस्ट लाइक केली होती. काही वेळातच त्याने तो लाइक काढून घेतला, पण तोपर्यंत त्याचा स्क्रीनशॉट सोशल मीडियावर व्हायरल झाला होता. यानंतर या प्रकरणावर अनेक चर्चा सुरू झाल्या आणि अखेर विराटला स्पष्टीकरण द्यावे लागले होते.

या प्रकरणावर विराटने त्याच्या इंस्टाग्राम स्टोरीमध्ये लिहिले होते, ममी हे स्पष्ट करू इच्छितो की फीड साफ करताना, अल्गोरिदमने चुकून काहीतरी इंटरॅक्शन नोंदवले असावे असे वाटते.

# ज्याला विराट कोहलीने धू धू धुतला आता त्याच खेळाडूने टीम इंडियाला दिला इशारा

मुंबई-क्रिकेट आशिया कप २०२५ ची सुरुवात ९ सप्टेंबरपासून होत आहे. १४ सप्टेंबरला दुबईत भारत विरुद्ध पाकिस्तान असा हाय-व्होल्टेज सामना रंगणार आहे. इतर कोणत्याही सामन्यापेक्षा या सामन्यातील दोन्ही संघांच्या खेळाडूंवर प्रचंड दबाव असतो. सामना सुरू होण्यापूर्वीच पाकिस्तानचा वेगवान गोलंदाज हारिस रऊफ याचा एक व्हिडीओ सोशल मीडियावर जोरदार व्हायरल होत आहे. हा तोच हारिस रऊफ आहे, ज्याला टी-२० वर्ल्ड कप २०२२ मध्ये विराट कोहलीने दोन चेंडूत दोन षटकार ठोकत सामना पूर्णपणे पलटवून टाकला होता. यातलं एक षटकार तर आयसीसीनेदेखील सामन्यानंतर 'आयसीसी शॉट ऑफ द सेंच्युरी' म्हणून सन्मानित केले.

भारत आणि पाकिस्तान हे दोघेही आशिया कपच्या गट-अ मध्ये आहेत. त्यामुळे १४ सप्टेंबरला एक सामना निश्चित आहे. मात्र या दोघांमध्ये दोन सामने होण्याची शक्यता जास्त आहे. इतकंच नव्हे तर जर दोन्ही संघ अंतिम फेरीत पोहोचले, तर चाहत्यांना तीन सामने पाहायला मिळतील. भारत आणि पाकिस्तानसोबत या गटात ओमान



आणि यूएई आहेत. त्यामुळे काही मोठा उलटफेर झाला नाही, तर सुपर-४ फेरीतही भारत-पाकिस्तानची टक्कर होणार हे जवळपास निश्चित आहे.

भारत विरुद्ध पाकिस्तान सामन्याबद्दल हरिस रौफ काय म्हणाला?

तिरंगी मालिकेसाठी यूएईमध्ये पाकिस्तान संघासोबत सराव करणाऱ्या उजव्या हाताचा वेगवान गोलंदाज हरिस रौफचा व्हिडिओ व्हायरल होत आहे. व्हायरल व्हिडिओमधील दाव्यानुसार, रौफला विचारण्यात आले की भारत आणि पाकिस्तान आशिया कपमध्ये दोनदा भिडू शकतात का? यावर रौफने उत्तर दिले, ''दोन्ही आपले आहेत. इन्शाअल्लाह.'' म्हणजे त्याला वाटत आहे की, पाकिस्तान दोन्ही सामने जिंकले.

आशिया कपमधील भारत विरुद्ध पाकिस्तान यांच्यातील आकडेवारी यंदा आशिया कप २०२५ टी-२० स्वरूपात होणार आहे. या फॉरमॅटमधील आशिया कपची ही तिसरी आवृत्ती आहे. यापूर्वी, भारत आणि पाकिस्तान टी-२० आशिया कपमध्ये ३ वेळा आमनेसामने आले आहेत, त्यापैकी भारताने २ वेळा आणि पाकिस्तानने १ वेळा विजय मिळवला आहे. याशिवाय, आशिया कपच्या एकदिवसीय स्वरूपात दोघेही १५ वेळा एकमेकांसमोर आले आहेत, त्यापैकी भारताने ८ वेळा आणि पाकिस्तानने ७ वेळा विजय मिळवला आहे.

# भारताला दोन्ही सामन्यात हरवू, हारिस रौफचा टीम इंडियाला इशारा

**नवी दिल्ली:**पाकिस्तानचा गोलंदाज हारिस रौफने भारतीय संघाला पराभूत करण्याबाबत मोठं वक्तव्य केलं आहे. आशिया चषक २०२५ स्पर्धेचा थरार येत्या ९ सप्टेंबरपासून सुरू होणार आहे. स्पर्धेतील पहिल्या लढतीत अफगाणिस्तान आणि हाँगकाँग हे दोन्ही संघ भिडणार आहेत. तर सर्व क्रिकेट चाहते ज्या सामन्याची आतुरतेने वाट पाहत आहेत, तो भारत- पाकिस्तान सामना १४ सप्टेंबरला रंगणार आहे. दोन्ही संघ एकमेकांविरूद्ध खेळताना विजय मिळवण्यासाठी पूर्ण जोर लावतात. आगामी आशिया चषकासाठी दोन्ही संघांचा एकाच गटात समावेश करण्यात आला आहे. त्यामुळे दोन्ही संघ कमीत कमी २ वेळा आणि अंतिम फेरीत प्रवेश केला, तर ३ वेळा आमनेसामने येऊ शकतात. या स्पर्धेला सुरूवात होण्याआधी पाकिस्तानचा गोलंदाज हारिस रौफचा एक व्हिडिओ सोशल मीडियावर तुफान व्हायरल होऊ लागला आहे.भारत आणि पाकिस्तान या दोन्ही संघांमध्ये झालेल्या टी-२० सामन्यांमध्ये भारतीय संघ नेहमीच वरचढ राहिला आहे. पण हारिस रौफला वाटतंय की, आगामी आशिया चषकातील दोन्ही सामन्यांमध्ये पाकिस्तानचा संघ भारतीय संघाला पराभूत करेल.

सोशल मीडियावर व्हायरल होत असलेल्या व्हिडीओमध्ये तुम्ही पाहू शकता की, एका चाहत्याने त्याला भारतीय संघाविरूद्ध होणाऱ्या सामन्याबद्दल प्रश्न विचारला. या प्रश्नाचं उत्तर देताना हारिस रौफ म्हणाला, ङ्ग दोन्ही आपलेच आहेत, इंशाअल्लाहः ङ्ग, हारिस रौफच्या मते, पाकिस्तानचा संघ दोन्ही सामने सहज जिंकेल. हा व्हिडीओ व्हायरल होताच नेटकऱ्यांनी हारिस रौफची फिरकी घ्यायला सुरूवात केली आहे.या स्पर्धेसाठी भारत आणि पाकिस्तान दोन्ही संघांची घोषणा करण्यात आली आहे. भारतीय संघाची जबाबदारी सूर्यकुमार यादवकडे असणार आहे. तर संघाच्या उपकर्णधारपदाची जबाबदारी शुबमन गिलकडे सोपवण्यात आली आहे. मात्र, या संघात श्रेयस अय्यरला स्थान देण्यात आलेलं नाही. तर दुसरीकडे पाकिस्तान संघाची जबाबदारी सलमानकडे सोपवण्यात आली आहे. दरम्यान संघातील सर्वात अनुभवी फलंदाज बाबर आझम आणि मोहम्मद रिझवानला या स्पर्धेसाठी पाकिस्तानच्या संघात स्थान देण्यात आलेलं नाही.हा सामना होणार की नाही, असा प्रश्न उपस्थित केला गेला होता. पहलगाम हल्ल्यानंतर दोन्ही देशांमध्य तणावपूर्वक वातावरण आहे. त्यामुळे भारतीय संघ पाकिस्तानसोबत खेळणार नसल्याचं म्हटलं जात होतं. पण आता भारत सराकारने पाकिस्तानविरूद्ध खेळण्यास हिरवं कंदील दाखवलं आहे. त्यामुळे यूएईत होणाऱ्या सामन्यात हे दोन्ही संघ भिडताना दिसतील.



## भाजपाचे राष्ट्रीय सह-संघटन मंत्री शिवप्रकाश यांची डॉ. अर्चनाताई पाटील चाकूरकर यांच्या देवघर निवासस्थानी सदिच्छा भेट



**लातूर/प्रतिनिधी :** महाराष्ट्र भारतीय जनता पार्टीचे राष्ट्रीय सह-संघटन मंत्री मा. श्री शिवप्रकाशजी यांचा आज लातूर दौऱ्यादरम्यान डॉ. अर्चनाताई पाटील चाकूरकर यांच्या ''देवघर'' या निवासस्थानी सदिच्छा भेट झाली. या भेटीच्या निमित्ताने चाकूरकर परिवाराच्या वतीने त्यांचा यथोचित सन्मान करण्यात आला.

मा. शिवप्रकाशजींच्या मार्गदर्शनाने पक्षाचे संघटन कार्य अधिक बळकट होईल, असा विश्वास यावेळी डॉक्टर अर्चनाताई पाटील चाकूरकर यांच्याकडून व्यक्त करण्यात आला. त्यांच्या उपस्थितीने कार्यकर्त्यांमध्ये नवचैतन्य निर्माण झाले असून, पक्षाच्या आगामी कार्ययोजनांना दिशा मिळणार आहे.

या प्रसंगी माजी मंत्री तथा अनुसूचित जाती मोर्चा प्रदेशाध्यक्ष दिलीप जी कांबळे,मराठवाडा संघटनमंत्री संजयजी कौडगे, आमदार अभिमन्यूजी पवार, आमदार रमेशजी कराड, माजी आमदार पाशाजी पटेल, माजी खासदार सुनीलजी गायकवाड, अरविंदजी पाटील निलंगेकर, ग्रामीण जिल्हाध्यक्ष बसवराजजी पाटील, शहर जिल्हाध्यक्ष अजितजी पाटील कव्हेकर, शैलेशजी लाहोटी, रामचंद्रजी तिरुके, मकरंदजी सावे, व्यंकटजी बेद्रे, प्रशांतजी पाटील, अविनाशजी कोळी तसेच भारतीय जनता पार्टीचे अनेक पदाधिकारी व कार्यकर्ते उपस्थित होते. सदिच्छा भेटीच्या निमित्ताने पक्ष संघटन, स्थानिक विकास आणि आगामी कार्यक्रमांबाबत सकारात्मक चर्चा झाली. या भेटीने लातूर जिल्ह्यातील पक्ष कार्याला नवी ऊर्जा मिळाली आहे.

## राष्ट्रीय महामार्ग ते आलमला मार्गावरील पूल दुरुस्त करण्याच्या सूचना



**लातूर/प्रतिनिधी :** औसा-लातूर राष्ट्रीय महामार्ग ते आलमला-उंबडगा रस्त्यावरील पुलाचे काम सुरु असून याठिकाणी तात्पुरता पर्यायी मार्ग तयार करण्यात आला होता. ऑगस्ट महिन्यात मोठ्या प्रमाणात पाऊस झाल्याने या पर्यायी मार्गावरील वाहतूक विस्कळीत झाली होती. ही वाहतूक अन्य मार्गाने वळविण्यात आली होती. सद्यस्थितीत पाण्याच्या प्रवाहाची स्थिती पाहून पर्यायी रस्त्यावरील पूल दुरुस्त करण्याच्या सूचना संबंधित ठेकेदार यांना दिल्या असल्याचे महाराष्ट्र ग्रामीण रस्ते विकास संस्थेचे कार्यकारी अभियंता ए. ए. खैरादी कळविले आहे.

पर्यायी रस्त्यावरील वाहतूक विस्कळीत आल्यानंतर आलमला गावातील नागरिकांना औसा येथे जाण्यासाठी विश्वेश्वरय्या पॉलिटेक्निक कॉलेज मार्गे वॉटर फिल्टर ते औसा, तसेच रामा-२४२ मार्गे औसा व लातूर येथे जाण्यासाठी गंगापूरमार्गे लातूर या मार्गाने वाहतूक करण्याबाबत कळविण्यात आले होते. तसेच उंबडगा गावातील नागरिकांना औसा येथे जाण्यासाठी ग्रामीण मार्ग-१७ मार्गे औसा व लातूर येथे जाण्यासाठी इजिमा-१३३ साबरमती विद्यालय येथून राममा-३६१ मार्गे लातूर जाण्याबत कळविण्यात आले होत. आता पाण्याची सद्यस्थिती लक्षात घेवून तातडीने पर्यायी मार्गावरील पुलाची दुरुस्ती करण्याच्या सूचना देण्यात आल्या आहेत. त्यानुसार कार्यवाही सुरु करण्यात आली आहे.

## प्रभावती मारुती मद्रेवार यांचे निधन



**चापोली/प्रतिनिधी :** येथील जेष्ठ व्यापारी गंगाप्रसाद मद्रेवार, गणेश मद्रेवार यांच्या मातोश्री प्रभावती मारुती मद्रेवार (९०) यांचे पहाटे दुःखद निधन झाले असून त्यांच्या पार्थिव देहावर चापोली येथे दुपारी १.०० वाजता अंत्यसंस्कार करण्यात आले आहेत.

# नांदेड- मुंबई वंदे भारत एक्सप्रेसने उघडले मराठवाड्याच्या समृद्धीचे द्वार : मुख्यमंत्री

## नांदेड - मुंबई वंदे भारत एक्सप्रेसचा मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या हस्ते हिरवा झेंडा दाखवून शुभारंभ

**नांदेड/प्रतिनिधी :** मराठवाड्याचे मागासलेपण दूर करण्यासाठी शासन गतिमान दळणवळणावर भर देत आहे. वंदे भारत एक्सप्रेस ने नांदेड, राजधानी मुंबईच्या अधिक जवळ आले असून यामुळे निश्चितच मराठवाड्याच्या समृद्धीचे द्वार उघडले आहे, असा विश्वास माननीय मुख्यमंत्री, श्री देवेंद्र फडणवीस यांनी व्यक्त केला.

नांदेड - मुंबई वंदे भारत एक्सप्रेसचा नांदेड रेल्वे स्थानकावरून शुभारंभ करण्यात आला. या रेल्वे गाडीचा माननीय मुख्यमंत्री श्री देवेंद्र फडणवीस यांनी मंत्रालयातून ऑनलाइन पद्धतीने हिरवा झेंडा दाखवून शुभारंभ केला. मंत्रालयात आयोजित कार्यक्रमाला माननीय सार्वजनिक आरोग्य राज्यमंत्री मेघना बोर्डीकर साकोरे, मध्य रेल्वेचे महाव्यवस्थापक, श्री धर्म वीर मीना, व इतर उच्च अधिकारी उपस्थित होते.

मुख्यमंत्री म्हणाले, ''माननीय पंतप्रधान श्री नरेंद्र मोदी यांच्या नेतृत्वात भारतीय रेल्वे कात टाकत आहे. प्रगत देशांसारखे आरामदायक सुविधा असलेली भारतात निर्मित वंदे भारत रेल्वे ही त्याचेच प्रतीक आहे. मुंबई ते नांदेड हे ६१० किलोमीटरचे अंतर ९.३० तासात पूर्ण होणार आहे. पूर्वी जालनापर्यंत धावणारी वंदे भारत आता हुजूर साहिब नांदेड पर्यंत जात आहे. या रेल्वे गाडीची क्षमता ५०० वरून १४४० पर्यंत वाढवण्यात आली आहे. तसेच गाडीचे डब्बे ८ वरून २० पर्यंत वाढवण्यात आले आहे.

नांदेड हे शिख धर्मियांचे महत्त्वाचे श्रद्धास्थान आहे. त्यामुळे येथे येणाऱ्या भाविकांना, प्रवाशांना वेगवान व आरामदायी प्रवासाची अनुभूती वंदे भारत एक्सप्रेसच्या माध्यमातून होणार आहे. वंदे भारत एक्सप्रेस च्या सुखकर, सुरक्षित आणि आरामदायी प्रवासासाठी मराठवाड्यातील जनतेचे अभिनंदनही मुख्यमंत्री श्री. फडणवीस यांनी यावेळी केले.

नांदेड येथे आयोजित कार्यक्रमप्रसंगी माननीय खासदार श्री अशोक चव्हाण, माननीय खासदार डॉ. अजित गोपछडे, माननीय आमदार, श्री विक्रम काळे, दक्षिण मध्य रेल्वेचे अतिरिक्त महाव्यवस्थापक श्री सत्यप्रकाश, मंडल रेल्वे व्यवस्थापक, नांदेड मंडल, श्री प्रदीप कामले, जिल्हाधिकारी श्री राहुल कर्डीले, नांदेड परिशेत्राचे पोलिस उपमहानिरीक्षक श्री शहाजी उमाप, पोलिस अधीक्षक श्री अबिनाश कुमार व इतर उच्च अधिकारी उपस्थित होते.





### नांदेड - मुंबई वंदे भारत एक्सप्रेस विषयी थोडेसे

* मराठवाड्यातील नांदेडला राज्याची राजधानी मुंबईशी जोडणारी पहिली वंदे भारत एक्सप्रेस.
* नांदेड ते मुंबई असा ६१० कि. मी. चा प्रवास फक्त ०९ तास ३० मिनिटांत पूर्ण, इतर गाड्यांच्या तुलनेत प्रवासाचा वेळ मोठ्या प्रमाणात कमी.
* महाराष्ट्रातील प्रमुख पर्यटनस्थळे व धार्मिक स्थळांदरम्यान वेगवान, सुरक्षित आणि आरामदायी वातानुकूलित दिवस अवधी प्रवासाची सुविधा.
* हुजूर साहिब नांदेड हून बुधवार व मुंबई छत्रपती शिवाजी महाराज टर्मिनस हून गुरुवार वगळता आठवड्यातून सहा दिवस गाडीची सुविधा प्रवाशांना मिळणार आहे.
* नियमित प्रवास करणारे प्रवासी, भाविक, अधिकारी व व्यापारी यांच्यासाठी ही गाडी अत्यंत उपयुक्त.
* पर्यटनस्थळे व तीर्थक्षेत्रांना जाणाऱ्या प्रवाशांसाठी प्रवास आणखी सोपा.

## जात प्रमाणपत्र, जात वैधता प्रमाणपत्र वितरणाला गती द्या-प्रा. डॉ. गोविंद काळे




**लातूर/प्रतिनिधी :** सध्या विविध शैक्षणिक कामांसाठी जात प्रमाणपत्रे व जात वैधता प्रमाणपत्रे मागणीचे प्रस्ताव विद्यार्थी, पालकांकडून दाखल होत आहेत. हे प्रस्ताव प्राधान्याने निकाली काढून पात्र अर्जदारांना प्रमाणपत्रे वितरीत करण्याची कार्यवाही गतिमान करण्याच्या सूचना महाराष्ट्र राज्य मागासवर्ग आयोगाचे सदस्य प्रा. डॉ. गोविंद काळे यांनी दिल्या. जिल्हाधिकारी कार्यालय येथे झालेल्या आढावा बैठकीत ते बोलत होते.

अपर जिल्हाधिकारी शिल्पा करमरकर, उपजिल्हाधिकारी गणेश पवार, उपविभागीय अधिकारी शरद झाडके, रोहिणी नऱ्हे-विरोळे, अविनाश कोरडे, सुशांत शिंदे, तहसीलदार सौदागर तांदळे, इतर मागास बहुजन कल्याण सहायक संचालक अभय अटकळ, जिल्हा जात प्रमाणपत्र समितीचे अधिकारी यावेळी उपस्थित होते.

१ ऑगस्ट २०२४ ते २५ ऑगस्ट २०२५ या कालावधीत लातूर जिल्ह्यात वितरीत ओबीसी, एसबीसी, व्ही.जे., एनटी., एसईबीसी, ईडब्ल्यूएस जात प्रमाणपत्र, जात वैधता प्रमाणपत्र याबाबत आढावा घेण्यात आला. जात प्रमाणपत्र मागणीसाठी आलेले प्रस्ताव तातडीने निकाली काढण्याची कार्यवाही सर्व उपविभागीय अधिकारी यांनी करावी. यामध्ये विद्यार्थ्यांच्या प्रस्तावांना प्राधान्य द्यावे. तसेच जात प्रमाणपत्र पडताळणी समितीकडे प्राप्त प्रस्ताव लवकरात लवकर निकाली काढण्याबाबत कार्यवाही व्हावी, असे डॉ. काळे म्हणाले.

जिल्ह्यातील आश्रमशाळांमध्ये विद्यार्थ्यांना शासकीय नियमानुसार चांगल्या सुविधा मिळणे गरजेचे आहे. या अनुषंगाने कार्यवाही होत असल्याची खातरजमा करण्यासाठी शासकीय अधिकाऱ्यांनी अचानकपणे आश्रमशाळांना भेटी देवून तेथील भोजन, शैक्षणिक सुविधांची तपासणी करावी, असे डॉ. काळे यांनी यावेळी सांगितले. लातूर जिल्ह्यातील सगर गवंडी, बेलदार समाजाच्या प्रतिनिधींशीही यावेळी त्यांनी चर्चा करून त्यांच्या मागण्या जाणून घेतल्या.

## मधमाशी पालन उद्योगात करिअरच्या अनेक संधी - प्रसिद्ध उद्योजक दिनकरराव पाटील

**लातूर/ प्रतिनिधी:** मधमाशी पालन हा शेतीपूरक व्यवसाय म्हणून आता मोठ्या प्रमाणात महाराष्ट्रामध्ये रुजत आहे.हा व्यवसाय अतिशय कमी भांडवलावर सुरू करता येऊ शकतो.त्यासाठी योग्य प्रशिक्षण घेणे ही आधुनिक काळाची खरी गरज आहे.मधमाशी पालन हे एक स्वयंरोजगार निर्मिती आणि बेरोजगारांना सक्षम करणारे तसेच निसर्गामध्ये जैवविविधता टिकवून ठेवणारे एक सशक्त माध्यम आहे.मधासोबत इतर जसे बी व्यॉक्स,पोलन्स,रॉयल जेली,मधमाशीचे विष यावर शास्त्रीय अभ्यास चालू आहे.मधाचा शरीरासाठी आणि अनेक व्याधीसाठी प्राचीन काळापासून वापर होत आहे.आज आधुनिक तंत्रामुळे मधमाशीचे विष,रॉयल जेली,पोलन ग्रेन्स यांचा वापर अनेक रोग,पोषक तत्त्वांची कमतरता तसेच उत्तम आरोग्यासाठी कुठलाही दुष्परिणाम नसलेले मधमाशी निर्मित उत्पादन आहे.म्हणूनच पाळू शकणाऱ्या मधमाशांच्या जाती व त्यासाठी लागणारे मनुष्यबळ मध आणि इतर मधांची उत्पादने यांची बाजारपेठ व त्यात असलेल्या अनेक संधी आज युवकांना उपलब्ध आहेत.मधमाशा व्यतिरिक्त अन्य उत्पादनांना बाजारात खूप जास्त किंमत आहे आणि मधमाशा शेतकऱ्यांसाठी व निसर्गासाठी अत्यंत उपयुक्त कार्य करतात. विद्यार्थ्यांनी मधमाशी पालन उद्योगांमध्ये करिअर करावे,त्यांना त्यात करिअरच्या अनेक संधी आहेत,असे प्रतिपादन प्रसिद्ध उद्योजक दिनकरराव पाटील यांनी केले.

लातूर येथील दयानंद विज्ञान महाविद्यालयातील प्राणिशास्त्र व मत्स्यशास्त्र विभाग व आयआयसी यांच्या संयुक्त विद्यमाने दि. २६ ऑगस्ट २०२५ रोजी नवोपक्रम व नव उद्योजकता या विषयावर एक दिवसीय कार्यशाळेचे आयोजन करण्यात आलेले होते.यावेळी ते प्रमुख साधन व्यक्ती म्हणून बोलत होते.या कार्यशाळेच्या अध्यक्षस्थानी महाविद्यालयाचे प्र.प्राचार्य डॉ.सिद्धेश्वर बेल्लाळे होते.याप्रसंगी विभाग प्रमुख डॉ.रवी सोळुंके,कार्यक्रम समन्वयक डॉ. सुरज कोल्हे,आयआयसीचे प्रमुख डॉ. श्रेयस माहुरकर,डॉ.रत्ना किर्तने,डॉ.अमोल ठोसर,प्रा.शिलेश गावित यांची प्रमुख उपस्थिती होती.

याप्रसंगी अध्यक्षीय समारोप करताना महाविद्यालयाचे प्र.प्राचार्य डॉ.सिद्धेश्वर बेल्लाळे असे म्हणाले की,पारंपरिक शेतीसोबतच युवकांनी आता मधमाशी पालनसारख्या शेतीपूरक व्यवसायाकडे वळले पाहिजे व त्याचे कौशल्य आत्मसात केले पाहिजे.ज्यामुळे रोजगारनिर्मिती होऊ शकेल आणि इतरांनाही रोजगार देता येऊ शकेल.

प्रास्ताविकातून विभाग प्रमुख डॉ. रवी सोळुंके यांनी विद्यार्थ्यांनी केवळ



चार भिंतीतला अभ्यासक्रम न शिकता नावीन्यपूर्ण कौशल्य आत्मसात करून निसर्गाचे संवर्धन करीत मधमाशी पालन करावे आणि इतरांना संधी,रोजगार मिळवून द्यावा या हेतूतून या कार्यशाळेचे आयोजन करण्यात आले असे त्यांनी सांगितले तर आभार प्रा.शिलेश गावित यांनी मानले.सूत्रसंचालन डॉ.अमोल ठोसर यांनी केले. याप्रसंगी प्रा.धरणे,प्रा. जाधव,बालाजी चित्ते,नाना काळुंखे,सुजित अपसिंगेकर,गोविंद सांगवे यांच्यासह इतर प्राध्यापक,शिक्षकेत्तर कर्मचारी बहुसंख्येने उपस्थित होते.

## आयुष्यमान कार्ड नोंदणी करण्याची मोहीम नागरीकांनी लाभ घ्यावा: आयुक्त श्रीमती मानसी

**लातूर/ प्रतिनिधी:** राज्य शासनाच्या प्राप्त सूचना तसेच आयुक्त मानसी आणि उपायुक्त खानसोळे यांच्या मार्गदर्शनानुसार व वैद्यकीय आरोग्य अधिकारी यांच्या नियोजनानुसार लातूर शहर महानगरपालिकेतील सर्व रहिवाशांचे आयुष्यमान कार्ड नोंदणी करण्याचे काम मोहीम स्तरावर आरोग्य विभागामार्फत चालू करण्यात आले आहे. ही मोहीम ८ सप्टेंबर पर्यंत चालणार आहे.

**आयुष्यमान कार्ड काढण्यासाठी आवश्यक कागदपत्रे**

१. अद्यावत रेशन कार्ड
२.आधार कार्ड
३. आधार लिंक मोबाइल नंबर

**योजनेअंतर्गत दिला जाणारा लाभ**

१. १३५६ प्रकारच्या आजारांवर उपचार
२. प्रति कुटुंब प्रति वर्ष रुपये पाच लाखापर्यंत मोफत उपचार.
३. लातूर शहरांमध्ये एकूण ३२ रुग्णालयांमध्ये हे उपचार घेता येतात.

**याचे लाभार्थी कोण आहेत**

लातूर शहरातील सर्व रहिवाशी तसेच यात उत्पन्नाची अट नाही.

**आयुष्मान वय वंदना कार्ड**

वय वर्ष ७० वर्षापुढील ज्येष्ठ नागरिकांचे आयुष्मान वय वंदना कार्ड काढता येते. याद्वारे त्या ज्येष्ठ नागरिकाला अधिकचा प्रति वर्ष रुपये पाच लाखापर्यंतचा मोफत उपचार मिळणार आहे.

**आयुष्यमान कार्ड नोंदणी कोठे करता येणार**

१. आशा स्वयंसेविका मार्फत
२. रास्त भाव दुकानदार (राशन दुकानदार)
३. नजीकच्या नागरी सुविधा केंद्रामध्ये

तरी लातूर शहर महानगरपालिका आरोग्य विभागाच्या वतीने सर्व नागरिकांना आवाहन करण्यात येते की मोहिमे दरम्यानच आयुष्यमान कार्ड नोंदणी करून घ्यावी जेणेकरून आपण व आपल्या कुटुंबातील सदस्यांना आरोग्यांच्या बाबतीत होणारा खर्च टाळता येईल.

प्रो. जडे यांचे रबरी शिक्के
कॉम्प्युटर नॉयलॉन रबर असलेले
टिकाऊ रबरी शिक्के
तयार करून मिळतील.



शाखा १.
जडे-भारत प्रिंटींग प्रेस, मेनरोड, लातूर
शाखा २.
जडेऑफसेट प्रिंटर्स, मित्र नगर, लातूर
संपर्क: (०२३८२) २४२६०८,२४५४०९

# लोक शाहीर अण्णा भाऊ साठे यांची १०५ वी जयंती साजरी



कळंब (प्रतिनिधी)- लोक शाहीर अण्णा भाऊ साठे यांची १०५ व्याजयंती निम्मीत लहुरत्न ग्रुप उत्तमी यांच्या वतीने जयती साजरी करण्यात आली यावेळे गावचे सरपंच प्रशांत बोंदर व विलास बापु लोंढे वैभव पाटील बापु बोदर यांच्या हास्त प्रतीमेच पुजन करूण मीरवणुकीस सुरूवात करण्यात आली.

यावेळी जयती चे अध्यक्ष राहुल जाधव गणेश धावारे विठ्ठल जाधव यांनी माण्यावराचे स्वागत केले या गावातील लहान मोठी मंडळी तसेच महिला मोठ्या संख्येने उपस्थित होत्या यावेळी अण्णाभाऊ साठे यांच्या जयघोषाने उत्तमी हे गाव दुमदुमले होते तसेच मंडळाचे सदस्य राम शेंडगे सुरज जाधवसंजय जाधव लहु जाधव अजय जाधव सर्वाच मडळाच्या सहकारी बांधवानी सहकार्य केले. या वेळी मार्गदर्शक खंडु भाऊ जाधव यांनी आभार मानले

# प्राथमिक शिक्षक संघाच्यावतीने दिल्या जाणाऱ्या शिक्षक प्रेरणा पुरस्कारासाठी १० शिक्षकांची निवड

कळंब (प्रतिनिधी)- विद्यार्थ्यांची गुणवत्ता वाढवण्यासाठी सतत प्रयत्नशील असणाऱ्या उपक्रमशील आदर्श शिक्षकांची कळंब तालुक्यातील १० शिक्षकांची महाराष्ट्र राज्य प्राथमिक शिक्षक संघाच्या वतीने दिल्या जाणाऱ्या शिक्षक प्रेरणा पुरस्कारासाठी निवड करण्यात आली असल्याची माहिती राष्ट्रीय प्राथमिक शिक्षक महासंघाचे राष्ट्रीय उपाध्यक्ष बाळकृष्ण तांबारे यांनी दिली .

महाराष्ट्र राज्य प्राथमिक शिक्षक संघाच्या वतीने प्रत्येक वर्षी गुणवत्ता वाढीसाठी उत्कृष्ट कार्य करणाऱ्या उपक्रमशील शिक्षकांना शिक्षक प्रेरणा पुरस्कार देऊन सन्मानित केले जाते.

सन २०२४ - २०२५ या शैक्षणिक वर्षातील शिक्षक प्रेरणा पुरस्कार जाहीर करण्यात आले असून हे पुरस्कार तालुक्यातील प्रत्येक केंद्रातून १ याप्रमाणे १० शिक्षकांची निवड करण्यात आली आहे. हा पुरस्कार प्रत्येक केंद्रातून प्राथमिक स्वरूपात दिला जाणार आहे.

**पुरस्कारासाठी निवड झालेले शिक्षक**

सुधाकर मधुकर सुरवसे (प्रशाला खामसवाडी) श्रीमती मनीषा सुधाकर देशमाने ( पाडोळी) श्रीमती पद्मा दत्तोपंत बुर्से (लोहटापूर्व)रमेशकुमार दादासाहेब काकडे (प्रशाला शिरढोण ) श्रीमती रोहिणी रामचंद्र जमाले ( गोविंदपुर) श्रीमती मनीषा भारत वाघमारे (येरमाळा) महादेव बळीराम मोहिते (सातेफळ) श्रीमती राजकन्या श्रीकिशन तोडकर (आंदोरा) श्रीमती सारिका रखमाजी शेळके (खोंदला) श्रीमती महादेवी नागनाथ झाडे (नप शाळा क्रमांक १ कळंब)

हा प्रेरणा पुरस्कार वितरण सोहळा दिनांक २८ ऑगस्ट २०२५ रोजी दुपारी पाच वाजता शिक्षक भवन कळंब या ठिकाणी मान्यवरांच्या शुभ हस्ते करण्यात येणार आहे.

या निवडीबद्दल महाराष्ट्र राज्य प्राथमिक शिक्षक संघाच्या वतीने राष्ट्रीय प्राथमिक शिक्षक महासंघाचे राष्ट्रीय उपाध्यक्ष बाळकृष्ण तांबारे, राज्यचिटणीस भक्तराज दिवाने, जिल्हा उपाध्यक्ष अनिल बारकुल, मार्गदर्शक दत्तात्रय पवार, प्रसिद्धी प्रमुख प्रदीप म्हेत्रे, तालुका नेते गणेश कोठावळे, तालुकाध्यक्ष प्रशांत घुटे, कार्याध्यक्ष महादेव मेनकुदळे, चिटणीस संतोष लिमकर, कोषाध्यक्ष प्रशांत निन्हाळ यांनी सर्व निवड झालेल्या शिक्षकांचे अभिनंदन केले आहे. तरी या कार्यक्रमास तालुक्यातील सर्व शिक्षक बंधू भगिनींनी मोठ्या संख्येने उपस्थित राहावे असे आवाहन तालुका शाखेच्या वतीने दीपक चाळक, अशोक डिकले, सुनील बोरकर, सचिन तामाने, अविनाश खरडकर, भूषण नानजकर, दत्तात्रय सुरेवाड, रवींद्र शिनगारे, श्रीमती वैशाली क्षिरसागर, श्रीम कालींदा मुंडे, श्रीम ज्योती ढेपे, रामचंद्र पवार, संतोष मोहिते, जनार्दन धुमाळे, संदीप मगर, अशोक बिक्कड, प्रदीप रोटे, यांनी केले आहे. महाराष्ट्र राज्य प्राथमिक शिक्षक संघाच्या वतीने प्रत्येक वर्षी उत्कृष्ट कार्य करणाऱ्या उपक्रमशिल शिक्षकांना प्रेरणा पुरस्कार देऊन सन्मानित केले जाते. हा पुरस्कार देत असताना कोणत्याही शिक्षकाकडून कसलीही फाईल किंवा कागदपत्रे घेतले जात नाहीत. प्रशासन, क्षेत्रीय अधिकारी व केंद्रातील शिक्षक प्रतिनिधी यांच्या समवेत चर्चा करून पुरस्कारासाठी शिक्षकांची निवड केली आहे

# दु:खावर मात करत तेजस्वीणी वाघमारे यांची पोलीस दलात दमदार इंट्री : येडोळा ग्रामस्थानी केला सत्कार



जळकोट (प्रतिनिधी)- पती निधनाच्या दु:खावर मात करत ११ वर्षीय मुलीचे शिक्षण व पालन- पोषण करत जिद्दीने पोलीस दलात भरती होण्याची तयारी करून तुळजापूर तालुक्यातील येडोळा येथील कन्या तेजस्वीनी विशांत वाघमारे-लोंढे यानी पोलीस दलात दमदार प्रवेश मिळवून नुकतच लोणावळा पुणे येथील पोलीस प्रशिक्षण केंदातून पोलीस कॉंस्टेबल पदाचे प्रशिक्षण पूर्ण करून रितसर धाराशिव पोलीस दलात रुजू झाल्या आहेत.ही एक आभिनंदयीन बाब असून त्यांचा सिध्दार्थ कला व क्रिडा मंडळ आणि रिपब्लिकन पार्टी ऑफ इंडिया (आठवले ) शाखा येडोळा च्या वतीने येथोचित सत्कार करण्यात आला.

नुकतच सिद्धार्थ कला व क्रिडा मंडळ येडोळा व रिपब्लिकन पार्टी ऑफ इंडिया (आठवले)शाखा येडोळाच्या संयुक्त विद्यामाने विविध क्षेत्रातील मान्यवरांच्या सत्कार समारंभाचे आयोजन करण्यात आले होते.या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी येथील जेष्ठ कार्यकर्ते रमेश लोंढे हे होते तर प्रमुख पाहणे म्हणून भाजपाचे नंदगाव जि.प. गटाचे गट प्रमुख सिद्धू आण्णा कोरे,जेष्ठ सामाजिक कार्यकर्ते कैलास गवळी गुरुजी,रिपाइंचे जिल्हा सचिव एस.के.गायकवाड, रिपाइंले नळदुर्ग शहराध्यक्ष मारुती खारवे,आदी उपस्थित होते.

प्रारंभी उपस्थित मान्यवरांच्या हस्ते तथागत भगवान गौतम बुद्ध व महामानव डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या प्रतिमांचे पुजन करून नुतन पो.कॉ.तेजस्वीनी वाघमारे-लोंढे,रिपब्लिकन पार्टी ऑफ इंडिया (आठवले) पक्षाच्या तुळजापूर तालुका अध्यक्षपदी निवड झाल्या बद्दल अरुण लोखंडे तर नंदगावचे नुतन सरपंच शशिकांत नागीले आदी मान्यवरांचा सत्कार करण्यात आला. कार्यक्रमाचे प्रास्ताविक व सुत्रसंचलन अमर जेटीथोर यानी केले.

यावेळी दलित पँथरचे जिल्हा संपर्क प्रमुख शामकांत नागीले, रिपाइंचे जळकोट शाखा अध्यक्ष,आरविंद लोखंडे, डीबीएन चे तालुका अध्यक्ष उमेश गायकवाड, रिपाइंचे तालूका संघटक सुरेश लोंढे, अर्जुन लोंढे,रिपाइंचे येडोळा शाखा अध्यक्ष देवानंद लोंढे, उपाध्याक्ष मारुती लोंढे,अमित लोंढे,भानुदास लोंढे,दिलीप भांगे,डॉ.सुरज लोंढे, सुनिता लोंढे,सुवर्णा लोंढे,शितल लोंढे,रेखा लोंढे,रतन लोंढे,स्नेहा लोंढे सह महिला,ग्रामस्थ,युवा कार्यकर्ते मोठया संख्येने उपस्थित होते.

# शाहू महाराज चौक-शिंगोली मार्ग उजळला! उड्डाणंपुलावरील पथदिव्याची नागरिकांची होती मागणी



धाराशिव(प्रतिनिधी)-धाराशिव धुळे सोलापूर महामार्गावरील धाराशिव शहराचा छत्रपती राजर्षी शाहू महाराज चौक ते शिंगोली विश्रामगृह हा मार्ग रहदारीचा बनला आहे. याठिकाणी दोन उड्डाणपूल असून त्या ठिकाणी पथदिवे बसविण्यात आले नव्हते. नागरिकांच्या मागणीप्रमाणे कंपनीकडून हे काम आता करून घेत असून, दुसऱ्या बाजूचे पथदिवे लवकर बसविण्यात येणार असल्याची माहिती शिवसेना ठाकरे पक्षाचे शहरप्रमुख सोमनाथ गुरव यांनी दिली आहे. या मार्गांवर वाहतूक कोंडी, अंधार आणि वारंवार होणारे अपघात यामुळे या रस्त्यावरून प्रवास करणे धोकादायक होते. या समस्यांकडे प्रशासनाचे लक्ष वेधण्यासाठी महाविकास आघाडीच्या वतीने वेळोवेळी आंदोलने करण्यात आली होती. अखेर संघर्षाला यश मिळाले असून सर्व्हिस रोड पूर्ण झाला आहे तर अंडरपासची कामे सुरूवातीच्या टप्प्यात आली आहेत.मात्र पथदिवे उड्डाणंपुलावर न बसवता त्या खालील रस्त्यावर बसविण्याची तयारी सुरु होती तेव्हा त्यांना रोवलेले खांब काढून ते पथदिवे उड्डाणंपुलावर बसविण्यास सांगितले होते. त्यानुसार आता एका बाजूचे दिवे बसविले आहेत. दुसऱ्या बाजूचेही दिवे लवकर बसविले जाणार आहेत. पथदिवे बसवण्याचे काम सुरू असल्याने परिसर उजळू लागला आहे. विशेष म्हणजे, या मार्गावरील दोन्ही उड्डाणपुलांवरही पथदिव्यांची उभारणी आंदोलने झाल्यानंतर सुरू झाली आहे. राजर्षी शाहू महाराज चौक, वीर शिवा काशीद चौक, माता रमाई चौक, संत काशीबा महाराज चौक या तीनही चौकात होणारे गैरप्रकार आता थांबणार आहेत. पहाटे फिरायला जाणाऱ्या नागरिकांनाही याचा फायदा होणार आहे. चोरीचे प्रकार, छेडछाडीसारख्या घटनाना देखील यामुळे आळा बसण्यास मदत होईल. या मार्गांवरील सर्व कामे पूर्ण होईपर्यंत महाविकास आघाडीचे लक्ष असून ही कामे तातडीने करण्यासाठी सुद्धा पाठपुरावा करत असल्याच सोमनाथ गुरव यांनी सांगितले आहे.

# ६८ कोटीच्या पाणीपुरवठा योजनेचे काम सप्टेंबर पासून सुरू होणार!- संजय मुंदडा यांची माहिती



कळंब (प्रतिनिधी)- शहराला मंजूर झालेल्या पाणीपुरवठा योजनेचे टेंडर रद्द करण्याचा प्रयत्न अनेकांनी केला होता मात्र त्याला यश आले नाही अखेर शहरातील ६८ कोटी रुपयांच्या पाणीपुरवठा योजनेतील अडथळे दूर झाले असून प्रत्यक्ष काम या येणाऱ्या सप्टेंबर पासून सुरु होणार आहे त्यामुळे शहराचा पाण्याचा प्रश्न मिटणार आहे असे माहिती माजी नगराध्यक्ष संजय मुंदडा यांनी दि . २३ रोजी आयोजित केलेल्या पत्रकार परिषदेत दिली आहे . शहराचा विस्तार दिवशीने दिवस वाढत आहे जुन्या लोकसंख्येनुसार असलेल्या पाणीपुरवठा योजनेमुळे शहरात पाणीपुरवठा करण्यासाठी अडचणी येत होत्या २२ जुलै २०२१ रोजी झालेल्या सर्वसाधारण सभेत या योजनेचा ठराव मंजूर करण्यात आला होता . त्यानंतर माजी नगराध्यक्ष संजय मुंदडा ,सुवर्णा मुंडे आणि प्रशासकीय अधिकाऱ्यांनी या योजनेचा परिपूर्ण प्रस्ताव तयार करून महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाकडे तांत्रिक मान्यतेसाठी सादर केला होता ,तत्कालीन पाणीपुरवठा मंत्री संजय बनसोडे खासदार ओमप्रकाश राजे निंबाळकर आमदार कैलास पाटील तसेच नंतरच्या काळात माजी पालकमंत्री डॉ .तानाजी सावंत यांच्या सहकार्यातून तांत्रिक मान्यता मिळाली अखेर या योजने चा कार्यारंभ आदेश देण्यात आला आहे . शिवसेनेचे समन्वयक नितीन लांडगे यांच्या सहकार्याने व उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या माध्यमातून महाराष्ट्र सुवर्ण जयंती नगरोथ्योन योजनेतून मंजुरी मिळाली आहे . येत्या सप्टेंबर महिन्यापासून या योजनेच्या कामाला प्रत्यक्षात सुरुवात होणार आहेअसे मुंदडा यांनी सांगितले . प्रसंगी तालुकाप्रमुख सचिन काळे, सागर मुंडे, शहर प्रमुख विश्वजित जाधव , उपजिल्हाप्रमुख सागर बाराते, उपशहर प्रमुख निर्भय घुले आदी या पत्रकार परिषदेसाठी उपस्थित होते .

कळंब नगरपालिकेला पाणी आरक्षण केवळ १.४९ दशलक्ष घनमीटर होते नवीन योजनेमुळे ते पाणी आता २ . ३४ दशलक्ष घनमीटर पर्यंत वाढले आहे त्यामुळे दररोज ८० लाख लिटर पाणी कळंब शहराला उचलता येणार आहे . नागरिकांना आता या मुळे पाणीटंचाई जाणवणार नाही .

या योजनेअंतर्गत जलशुद्धीकरण केंद्रात एकावेळी ५० लाख लिटर पाणी शुद्ध करून सोडले जाणार आहे एकूण ५४ किलोमीटर पाईपलाईन टाकली जाणार आहे छत्रपती शिवाजी महाराज चौकाजवळ जुनी फिल्टर येथे ९ .६ लाख लिटर क्षमतेचे तर येरमाळा रोड वरती ७ लाख लिटर क्षमतेचे आणि पुनर्वसन सावरगाव हनुमान मंदिर येथे ६ . १३ लाख लिटर क्षमतेची नवीन टाकी उभारली जाणार आहे या योजनेत सौर ऊर्जा तंत्राचा वापर करून वीज बचत केली जाणार आहे . यासाठी एकूण ६८ कोटी रुपयांचा निधी शासनाकडून मंजूर झाला आहे असून कळंब नगर परिषदेच्या इतिहासात प्रथमच इतक्या मोठ्या प्रमाणात निधी मिळाला आहे .

मंजूर योजनेचे टेंडर रद्दचा प्रयत्न झाल्याचा आरोप करत निविदा प्रक्रियेला मान्यता नगर विकास विभागाचे प्रधान सचिव के . गोविंदराज आणि समितीमार्फत दिली जाते काही व्यक्तींनी सरकार दरबारी ओळखीचा गैरफायदा घेत योजना रद्द व्हावी म्हणून आटापिटा केल्याचा आरोप माजी नगराध्यक्ष संजय मुंदडा यांनी पत्रकार परिषद केला पण हा केवळ निराश चा भोपळा ठरलाअसाही घाणाघात संजय मुदंडा यांनी केला .

# २,१९,३००/-ची 'तडजोड शुल्क'वसुल

धाराशिव (प्रतिनिधी)- शहर वाहतुक शाखा व संबंधीत पोलीस ठाण्यांनी महत्त्वाच्या रस्त्यांवर दि.२५ऑगस्ट रोजी मोटार वाहन कायदा-नियम भंग प्रकरणी एकुण २८० कारवाया करुन २,१९,३०० 'तडजोड शुल्क'वसुल केले आहे.

**Name of change Declaration**
Here in this advertise i am declaring that i have change
My Name which was : **SHIVAJI MOKINDA.**
TO: **SHIVAJI MOKINDA BANKAR.**
Hence for this Declaration i will be known by this name and will use in future the **SHIVAJI MOKINDA BANKAR** will used by my family husband /wife, children and relative.
OLD NAME :- **SHIVAJI MOKINDA.**
NEW NAME:- **SHIVAJI MOKINDA BANKAR.**
Address :- AT POST DHANORA TA. LOHARA, DIST OSMANABAD.413604.
Adhar no.-752280309017
Mob. No.-9420203131

झाडे लावा!
झाडे जगवा!!

लातूर समाचार उस्मानाबाद
बातम्या,लेख व जाहिराती साठी संपर्क
9422472502
9175325708

## उस्मानाबाद शहरातील कांही महत्वाचे फोन नंबर

१) रुग्णवाहिका २२३९७६
२) रक्तपेढी २२३९७६
३) जिल्हा रुग्णालय २२६९२७
४) शहरपोलिस स्टेशन२४०९९९
५) अग्नीशामक विभाग २२२१०१
६) रेल्वेस्टेशन २४०९९९
७) एसपी कार्यालय २२७६२०
८) जिल्हाधिकारी का.२२४५०१
९) तहसिल का. २२७८८२
१०) जि.प. २२५४०७
११)नगरपरिषद २२५४०७
१२)जिल्हा माहिती अधिकारी ०२४७२-२२२७४४
१३) जिल्हा उद्योग केंद्र (डीआयसी) ०२४७२-२२२२२६
१४) उस्मानाबाद जिल्ह्याचे उपसंचालक ०२४७२-२२७८ ९ २
१५) उप विभागीय वन कार्यालय, उस्मानाबाद ०२४७२-२२३४०८
१६)अधीक्षक उत्पादन शुल्क कार्यालय ०२४७२-२२३३८७
१७) जिल्हा कल्याण अधिकारी ०२४७२-२२२०१४
१८) प्रादेशिक परिवहन अधिकारी (आरटीओ) ०२४७२-२२२५५५
१९) मुख्य पोस्ट ऑफिस ०२४७२-२२२२१४
२०) जिल्हा रोजगार अधिकारी ०२४७२-२२२२३६
२१) विभागीय नियंत्रक (एमएसआरटीसीसी) ०२४७२-२२२२१६
२२) लातूर समाचार ९४२२४७२५०२
बीडीओ, एम.आर.ए.जी.एस. जिल्हा परिषद ०२४७२-२२०६११
२३)मुख्य कार्यकारी अधिकारी ०२४७२-२२६८४० २४)
२४) अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी ०२४७२-२५)
२२३३९७ प्रकल्प संचालक ०२४७१-२२१५५२
२५) उपमुख्य कार्यकारी अधिकारी (सामान्य प्रशासन) ०२४७२-२२३३८८
२६) उपमुख्य कार्यकारी अधिकारी (ग्राम पंचायत) ०२४७२-२२३३४३
२७) उप मुख्य कार्यकारी अधिकारी (स्त्री व मुल) ०२४७२-२२२५७०
२८) मुख्य खाते व वित्त अधिकारी ०२४७२-२२२१३२
२९) शिक्षण अधिकारी (प्राथमिक) ०२४७२-२२४१८४
३०) शिक्षण अधिकारी (माध्यमिक) ०२४७२-२२४१८४

हे पत्र मुद्रक,प्रकाशक, संपादक व मालक दयानंद शंकरराव जडे, यांनी जडे ऑफसेट प्रिंटर्स, मित्रनगर, लातूर (महाराष्ट्र) येथे छापून समर्थनगर उस्मानाबाद येथे प्रकाशित केले. मो.नं.९४२२४७२५०२
Latur Samachar, Osmanabad Printed & Published by Jade Dayanand Shankarrao , Printed at Jade Offset Printers,Mitra Nagar Latur. and Published at Samarthnagar,Osmanabad. Editor : Jade Dayanand Shankarrao Mob:9422472502 RNI- MAHMAR/2003/11649